|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : २२+२३ सोमवार दि. २९ मे २०२३ ते रविवार दि. ४ जून २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पती पत्नीच्या वादात तिने उचलला हात गळा आवळून तिचा पतीनेच केला घात

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर





संसारात कोणत्या ना कोणत्या कारणावरून पती-पत्नीचे भांडण होतच असते. पण अशा भांडणात दोघांपैकी एकाने कुणीतरी संयम राखायला हवा तरच संसार टिकून राहतो. खास करून पती पत्नीच्या भांडणात पत्नीने वरचढ होण्याचा प्रयत्न केल्यास पतीचा इगो दुखावतो आणि त्यानंतर ...पान २ वर

## समलिंगी मित्राची पत्नीही त्याच्या तावडीतून नाही सुटली वासनेच्या अती हव्यासामुळे अखेर आयुष्याची दोरी तुटली

बुलढाणा (उंबरखेड)/क्राईम रिपोर्टर



मयत प्रदीप कायंदे

समलिंगी संबंध हि एक विकृती आहे. मात्र हि विकृती पाश्चात्य देशामधेच बघायला मिळत असे पण गेल्या काही वर्षापासून हि विकृती भारतीय लोकांमध्येही बघायला मिळत आहे. खास करून हाय सोसायटीतील तरुण या विकृतीच्या आहारी जात आहेत. त्यातूनच समलिंगी संबंधाना संरक्षण देणारे कलम ३७७ हटवण्यासाठी समलिंगी लोकांची आंदोलने झाली आणि अखेर त्यांच्या आंदोलनाला यशही आले. तेंव्हापासून समलींगींची संख्या आणि व्याप्ती वाढत चालली आहे आणि आता तर गे आणि लेस्बियन अशा समलिंगी लोकांचे क्लब निघाले आहेत. त्यातून पार्ट्या आयोजित केल्या जात आहेत आणि या पार्ट्यांमध्ये अमली पदार्थाचे मोठ्या प्रमाणात वाटप केले जात आहेत. अशा पार्ट्यांच्या जाहिराती केल्या जात आहेत आणि हाय सोसायटीतील उच्च शिक्षित तरुण तरुणी या जाहिरातींना बळी बडून समलिंगी समूहात सामील होत आहेत. पण या विकृती मधून खुनासारख्या काही गुन्हेगारी घटनाही घडत आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील उंबरखेडमध्ये समलिंगी गे ॲपच्या माध्यमातून प्रदीप कायंदे आणि सोपान बोराडे हे दोन उच्च शिक्षित मित्र एकत्र आले आणि त्यांच्यात रिलेशन निर्माण झाले. प्रदीप सोपानच्या नेहमी घरी यायचा आणि सोपानबरोबर तासंतास घालवायचा. पण आता त्याची नजर सोपानच्या सुंदर पत्नीवर पडली. सोपानच्या पत्नीलाही प्रदीप आवडला होता. त्यामुळे एके दिवशी त्याने सोपानला दारू पाजून त्याला त्याच्या घरात झोपवून ठेवले आणि त्यानंतर त्याच्या पत्नीला जवळ घेतले. पण त्याच वेळी सोपानचा भाऊ घरी आला आणि त्याने प्रदीप आणि सोपानच्या पत्नीला नको त्या अवस्थेत पाहिले, तसा तो संतापला. त्याने आपल्या मुलाला आणि तिथे राहणाऱ्या एका नातेवाईकाला बोलावले तसेच नशेत असलेल्या सोपानला उठवले प्रदीप आपल्या पत्नीशी संबंध ठेवतोय हे पाहून सोपनही खवळला आणि मग चौघांनी मिळून प्रदीपला बेदम मारून त्याची हत्या केली आणि त्याचा मृतदेह मार्केड यार्ड परिसरात फेकून दिला. पोलिसांना हा मृतदेह सापडल्यानंतर तपास सुरु झाला आणि मोबाईल तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली.

प्रदीप भाऊराव कायंदे हा तरुण जालना येथे बीपीओ कंपनीमार्फत बँकेत वसुली अधिकारी म्हणून नोकरीला होता. बुलढाणा जिल्ह्याच्या देऊळगाव राजा तालुक्यातील उंबरखेड या गावी तो आपल्या परिवारासह रहात होता. चाळीसीच्या घरातील प्रदिप यास पत्नी आणि दोन मुलांचा सुखी संसार होता. नोकरी निमीत्त प्रदीप हा उंबरखेड ते जालना मोटार सायकलने प्रवास करत असे. एकंदरीत प्रदीप कायंदे या तरुणाचे सर्व काही सुरळीत सुरु होते. कामानिमीत्त मोबाईल हाताळत असतांना काही अश्लिल व्हिडीओ प्रदीपच्या पाहण्यात आले. यामधे काही समलिंगी संबंधाचे देखील व्हिडीओ होते. ते व्हिडीओ बघून प्रदीपच्या मनात समलिंगी संबंधाची इच्छा निर्माण झाली. गेल्या दोन वर्षापूर्वी प्रदीपने गे मोबाईल अँपचा वापर सुरु केला होता. या गे अँपच्या माध्यमातून समलिंगी संबंधाची इच्छा बाळगणारे आणि संबंध ठेवणारे सदस्य त्याच्या संपर्कात आले. त्यापैकी सोपान सदाशिव बोराडे हा एक सदस्य होता. तो देखील समलिंगी संबंधाची इच्छा मनात बाळगून होता. प्रदीप कायंदे आणि सोपान बोराडे हे दोघे विवाहीत असले तरी समलिंगी संबंधाची इच्छा



संशयित आरोपी सोपान बोराडे

मनात बाळगणारे समविचारी मित्र बनले होते. सोपान बोराडे हा मंठा शहराच्या शांती नगर भागातील रहिवासी होता. नजीकच्या नांदशी ग्रामपंचायतीत काम करणाऱ्या सोपान बोराडे याला देखील पत्नी आणि दोन मुले होती. गे ॲपच्या माध्यमातून प्रदिप आणि सोपान हे दोघे तरुण एकत्र आले. एके दिवशी दोघे एकमेकांना भेटले. पहिल्याच भेटीत दोघांनी एकमेकांसोबत समलिंगी संबंध केले. अनैसर्गीक समलिंगी संबंधाचा अभुतपुर्व अनुभव दोघांनी या वेळी घेतला. दोघांना त्यात समाधान मिळाले. समलिंगी संबंधाचा अनुभव घेतल्यानंतर प्रदीपला नेहमीनेहमी तसे संबंध करण्याची इच्छा होऊ लागली. त्यामुळे नोकरीचे ...पान २ वर

## शेतीच्या हिश्यावरून मुलाचे डोके फिरले ट्रॅक्टर खाली चिरडून बापाला ठार मारले

मिरज/क्राईम रिपोर्टर



मयत दादासो

ग्रामीण भागात शेती हेच माणसाच्या उपजीविकेचे साधन असल्याने जमिनीच्या तुकड्याला माणूस आपल्या प्राणापेक्षाही अधिक जपत असतो. त्यामुळे शेतीवरून कुटुंबातील लोकांमध्येच वाद होत असतात. यातील काही वाद न्यायालयात जातात तर काही वाद माणसाचा जीव घेतात. मिरज येथील दादासो आकळे यांची ३ लग्ने झाली, त्यातील दोन बायकांनी आत्महत्या केली तर तिसरी जिवंत होती. मात्र पहिल्या बायकोचा मुलगा लक्ष्मण याने बापाकडून ८० हजार उसने घेऊन ट्रॅक्टर विकत घेतले होते. तसेच त्याला अर्धी शेती स्वतःच्या नावावर करून हवी होती, पण वडिलांचा आणि सावत्र भावाचा त्याला विरोध होता. उलट वडील त्याच्याकडे त्याने उसने घेतलेले ८० हजार परत मागत होते. त्यामुळे लक्ष्मण चिडला आणि त्याने बापाला ट्रॅक्टर खाली चिरडून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.





आरोपी लक्ष्मण

दादासो गणपती आकळे हे आपल्या कुंटूंबासह बेडग मालगाव रस्त्यावरील उपार वस्तीवर राहयला आहेत. त्यांनी तीन लग्ने केली असल्यान घरात कौटुंबिक कलह हा होत होता. त्यातच गेल्या २० वर्षापूर्वी त्याच्या पहिल्या पत्नीने कौटुंबिक वादातून आपल्या शेतातील विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली होती. त्यानंतर त्यांनी दुसरे लग्न केले. दुसऱ्या पत्नीने ही कौटुंबिक वादातून विष पिले होते. त्यानंतर दादू यांनी तिसरे लग्न केले. हल्ली ते आपल्या तिसऱ्या पत्नी आणि मुलाबरोबर राहयला आहेत. त्याच्या पहिल्या पत्नीला लक्ष्मण हा मुलगा असून त्याचे लग्न झाल्याने तो आपल्या पत्नी मुलासह घरातच वेगळे राहयला आहेत. दुसऱ्या पत्नीला मुल वैगरे काही झाले नाही. त्यामुळे तिने आत्महत्या केल्याने त्यांना काही फरक पडला नाही. तिसऱ्या पत्नीचा मुलगा अर्जुन हा वडिलांची शेती सांभाळत असल्याने लक्ष्मण आणि वडिल दादू याच्यात शेतीच्या वाटणीवरून वाद सुरू झाला. लक्ष्मण याला ...पान २ वर

## बोरिवलीमध्ये रात्रीच्या वेळी भलतेच झाले चोर समजून पोलिसाच्या भावाला ठार केले



मुंबई/क्राईम रिपोर्टर


जमावाच्या हुल्लडबाजीतून मॉबलिंचीगचे प्रकार घडतात आणि त्यातून एखाद्या निरपराध माणसाचा जीव जातो. कारण एखाद्या माणसाला चोर किंवा खुनी समजून जेंव्हा लोक पकडतात. तेंव्हा त्याचे काहीही एकूण न घेता त्याला मारहाण करतात. त्यामुळे अशा तऱ्हेच्या जमावाच्या मारहाणीत अनेक निरपराध लोकांचा मृत्यू झाला आहे. बोरिवलीत अशाच एका घटनेत दारूच्या नशेत सोसायटीत शिरलेल्या एका तरुणाला चोर समजून तिथल्या लोकांनी इतके मारले कि त्याचा जीव गेला. नंतर समजले कि तो चोर नसून एका पोलीस अधिकाऱ्याचा भाऊ आहे. या प्रकरणी पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे.

२५ मे च्या रात्री दीडच्या सुमारास बोरिवलीतील कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कार्टर रोड क्रमांक ...पान २ वर

## संपत्तीसाठी पत्नीचा छळ करायचा भारी मुलीनेच दिली बापाच्या हत्येची सुपारी

नागपूर/क्राईम रिपोर्टर

कुटुंबातील एखादा माणूस जर आपल्याच नात्यातील माणसाना त्रास देवू लागला, तर त्याच्या त्रासाला कंटाळलेली त्याच्या कुटुंबातील माणसे नात्यागोत्याचा जराही विचार न करता त्याचा शेवट करतात. नागपूरमध्ये अशीच एक घटना उघडकीस आली आहे. एका ६० वर्षाच्या इसमाचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध होते. मात्र त्याची सर्व संपत्ती त्याच्या बायकोच्या नावावर होती, ही संपती आपल्या नावावर करून दे असे तो पत्नीला सांगत होता, पण पत्नी ऐकत नव्हती. त्यामुळे पत्नीला मारहाण करायचा अखेर आपल्या आईचे हे हाल बघून त्या वृद्धाच्या मुलीनेच आपल्या बापाच्या हत्येची ५ लाखांची सुपारी देवून त्याचा गेम केला. या प्रकरणी सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.



मुलीचं अन् वडिलांचं नातं अनोखं असतं. मुलीचा वडिलांवर सर्वाधिक जीव असल्याचं म्हटलं जातं. मात्र नागपुरात या नात्याला काळीमा फासणारा प्रकार समोर आला आहे. लेकीनेच जन्मदात्या बापाच्या हत्येचा कट रचला. यासाठी तिने ५ लाखांची सुपारीही दिली. वडिलांवर १९ सेकंदात २९ वार करीत संपवण्यात आलं. ही थरकाप उडवणारी घटना नागपूर जिल्ह्यातील भिवापूर येथे घडली आहे. सात दिवसांनी या हत्येमागील नेमकं कारणं समोर आलं. जे पाहून पोलिसांनाही धक्का बसला. नागपूरातील भिवापूर येथे ...पान ६ वर

## बापाचे भांडण मुलीसाठी प्राणघातक ठरले चिमुरड्या कार्तिकीला पाण्यात बुडवून मारले

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



आरोपी राजू

काही लोक इतके खुनशी असतात कि एकावरचा राग दुसऱ्यावर काढतात आणि एकदा का असा माणूस सुडाने पेटला कि मग त्याला कशाचेही भान राहत नाही. कोणाचाही जीव घ्यायची त्याची तयारी असते. कोल्हापुरात अशीच एक संतापजनक घटना घडली आहे. वीटभट्टीवर काम करणाऱ्या गणेश व राजू बिहारीया दोन मजुरांचे भांडण झाले होते. याच भांडणामुळे कामचोर असलेल्या राजू बिहारीचा वीटभट्टीच्या मालकाने पगार कमी केला होता. गणेश याच्या सांगण्यावरूनच मालकाने आपला पगार कमी केला असा राजू बिहारीचा समज झाला. त्यामुळे गणेशवरचा राग त्याने गणेशच्या अडीच वर्षांच्या मुलीवर काढला आणि तिचे अपहरण करून तिला पाण्याच्या टाकीत बुडवून मारले. या प्रकरणी पोलिसांनी राजू बिहारीला अटक केली आहे.

गुरूवार दि.१८ मे रोजी जुना राजवाडा पोलीस ठाण्यात एका अडीच वर्षाच्या बालिकेचे अपहरण झाल्याची नोंद झाली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्या बालिकेचा मृतदेह रंकाळा परिसरातील एका पाण्याच्या टाकीत आढळून आला. करवीर तालुक्यातील बालिंगा पाडळी येथील एका वीट ...पान २ वर

## दारू पाजणाऱ्यांची चुगली करायला गेला चुगलखोर राजेश मित्रांच्याच हातून मेला

डोंबिवली/एस.कुमार

काही लोक इतके नमक हराम असतात कि ज्याचे खातात त्याच्यावरच टांगवर करतात. मानपाडा येथील बेवारस राजेश हा सुद्धा असाच होता. त्याचा मागे पुढे कोणी नव्हते. 'होटल में खाना और फुटपाथ पे सोना' अशी त्याची स्थिती होती. त्यामुळेच दादू जाधव याला त्याची दया यायची आणि याच दयेपोटी त्याने राजेशला मित्र मानून त्याला अधून मधून दारू पाजायचा. मात्र राजेशला या उपकाराची कदर नव्हती. त्याला जे दारू पाजायचे त्यांचीच तो दारूच्या धंदे वाल्याकडे बुराई करायचा. मात्र हा प्रकार दादु आणि त्याच्या मित्रांना समजताच त्यांनी राजेशचा गेम करून टाकला. मात्र पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



डोंबिवली पूर्वकडील सोनारपाडा येथील साईश्रध्दा बिल्डींगच्या मागे, कचऱ्यामध्ये एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पडला असल्याची माहिती मानपाडा पोलीस स्टेशनला मिळाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बिल्डींगचे मागे जावुन खात्री केली असता,त्या ठिकाणी एक अनोळखी व्यक्ती चा मृतदेह आढळुन आला. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता त्याच्या नाकातोंडास, हातास व पाया जखमा झालेल्या दिसून येत होत्या.पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटावी म्हणून आजूबाजूला राहणाऱ्या रहिवाशांकडे चौकशी केली परंतु कोणी ही माहिती देण्यास पुढे आले नाही.पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून तो मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात ...पान ६ वर

## धमकी दिल्याचा राग उफाळून आला मित्रांनी दारू पाजून मित्राचा गेम केला

बेळगावी/क्राईम रिपोर्टर



मयत म्हातेश

मित्रांनी मैत्री टिकवण्यासाठी एकमेकांशी सलोख्याचे संबंध ठेवायचे असतात. मैत्रीत मित्राचे मन दुखावणार नाही आणि त्यातून मैत्रीत दुरावा येणार नाही याची काळजी घ्यायचे असते. पण काही लोक याबाबत बेफिकीर असतात त्यांना मित्राची किंवा मैत्रीची फिकीर नसते. मारिहाळ येथील म्हातेश हा सुद्धा असाच होता. त्याने एकदा आपल्या जवळच्या मित्राला शिवीगाळ करून धमकी दिली होती, त्या धमकीमुळे दोघांमध्ये दुष्मनी निर्माण झाली. त्यानंतर महांतेशचा गेम करण्यासाठी त्याच्या मित्रांनी तात्पुरता समझौता घडवून आणला आणि एके दिवशी त्याला दारूच्या परतीसाठी बोलावून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



मारीहाळ येथे महांतेश रूद्राप्पा करलिंग्नावर हा आपल्या आई वडिलासह रहायला आहे. तो कॉलेज करीत काम ही करीत होता. त्याच्या घरची परिस्थीती ही बेताचीच होती. घरची थोडी फार शेती असली तरी ती शेती वडिल आणि आई बघत होते.तो चांगला शिकावा चांगली नोकरी करावी असे त्याच्या आई वडिलांना वाटत होते. पण आजकाल महांतेश हा कॉलेजच्या मित्राबरोबर वाईट संगतीला लागला असल्याने त्याला दारू पिण्याची सवय जडली होती. मारीहाळ गावातीलच त्याचे मित्र अक्षयकुमार कोणकेरी आणि राजेसाब मुल्ला हे त्याचे चांगले मित्र होते. ते ही त्याचेबरोबर कधी दारूची पार्टी करीत होते. महांतेशला दारू पिण्याची सवय लागल्याने तो हल्ली कामावर ही जात नव्हता. त्यामुळे त्याचे आई वडिल त्याला सारखे ओरडत ...पान ६ वर

29 MAY TO 04 JUNE 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 5/27/2023 8:28 PM Page 1



पान १ वरून...

## पती पत्नीच्या वादात तिने उचलला...

तो कोणत्याही थराला जावू शकतो. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा शहरात पती पत्नीच्या वादात पतीने पत्नीला मारहाण करताच तिनेही पतीच्या थोबाडीत मारली. त्यामुळे चिडलेल्या पतीने पत्नीची गळा आवळून हत्या केली आणि तिने आत्महत्या केल्याचा बनाव केला. मात्र पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पडला आणि त्याला अटक केली. ३ एप्रिल सोमवारचा दिवस सकाळचे १०.३० झाले होते. देऊळगाव (राजा) शहरातील शिवाजी पार्क उंबरखेड रोड येथे राहणारे, भास्कर गीते यांची सून शिवकन्या सुनील गीते (वय २५) ला सासू चंद्रभागा गीते व पती सुनील गीते यांनी त्यांचे शेजारी राहणारे राहुल कायंदे यांच्या सहकार्याने, अत्यवस्थ अवस्थेत शहरातील सरकारी रुग्णालयात दाखल केले. शिवकन्या यांनी गळफास घेतल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांना सांगितले. कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून शिवकन्या गीते यांना मृत घोषित केले होते. शिवकन्या यांचा मृत्यू झाल्याचे समजताच पती सुनील गीते याने दवाखान्यातून काढता पाय घेतला. त्यामुळे राहुल कायंदे यांनी मृतक शिवकन्याचे वडील अशोक सोनुने पिंप्री खंदारे ता. लोणार यांना या घटनेची माहिती दिली. रुग्णालयातून देऊळगाव राजा पोलिसांना मेमोद्वारे या घटनेची माहिती मिळाल्याने पोलिसांनी घटनास्थळ गाठले. घटनास्थळ भास्कर गीते यांचे घर शिवाजी पार्क उंबरखेड रोडवर होते. पोलिसांना घटनास्थळ असलेल्या त्या चार रुमच्या घरात गळफास घेतल्याचा प्रथमदर्शनी कुठलाच पुरावा किंवा आत्महत्या करण्यासारखी परिस्थिती दिसली नाही, त्यामुळे पोलिसांना या घटनेबाबत संशय आला. शेजाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी मृतक शिवकन्या अत्यवस्थ अवस्थेत हुंदके देताना पलंगावर दिसली होती. तिच्या शेजारी सुनील बसला होता. तिचा श्वासोश्वास सुरू असल्याने दवाखान्यात घेऊन गेले असे सांगितले. तर पोस्टमार्टम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गळा दाबून मृत्यू झाल्याचा प्राथमिक अहवाल दिला होता. त्यामुळे मृतकने गळफास घेण्याचा प्रश्नच येत नव्हता. मात्र ठोस निर्णयापर्यंत पोलीस पोहचू शकत नव्हते. पोलिसांनी दिसल्या परिस्थितीचा घटनास्थळ पंचनामा केला आणि मृतकाचे पोस्टमार्टम झाल्यावर नवरा गायब झाल्याने प्रेत वडिलांच्या ताब्यात देण्यात आले. मोठ्या शोकाकुल वातावरणात पिंपरी खंदारे तालुका लोणार येथे मृतक शिवकन्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ५ एप्रिल रोजी पोलिसांना पोस्टमार्टम चा रिपोर्ट मिळाला. त्यामध्ये मृतकाचा मृत्यू कोणत्यातरी वस्तूने गळा आवळल्याने झाल्याचा स्पष्ट अभिप्राय डॉक्टरांनी दिला. त्यामुळे शिवकण्याचा खूनच झाल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी पोस्टमार्टम रिपोर्ट व घटनेच्या वेळी उपस्थितांच्या जबाब वरून सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक किरण खाडे यांनी फिर्याद दाखल केल्याने मृतक शिवकन्या सुनील गीते यांच्या खून प्रकरणी पती आरोपी सुनील भास्करराव गीते वय ३५ याचे विरुद्ध कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करून त्यास देऊळगाव राजा शहरातूनच ५ एप्रिल च्या मध्यरात्री अटक करण्यात आली. त्यास ६ एप्रिल रोजी स्थानिक न्यायालयासमोर उभे केले असता, विद्यमान न्यायालयाने त्याला ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी दिली. पोलीस कोठडीत आरोपी सुनील गीते ला विश्वासात घेऊन पोलिसांनी विचारणा केली असता, त्याने गुन्हा कबूल केला आणि घडलेला सर्व प्रकार कथन केला. राज्य राखीव पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेले, भास्करराव माधवराव गीते यांचा मोठा मुलगा सुनील याचा विवाह पिंप्री खंदारे ता. लोणार येथील अशोक पंढरीनाथ सोनूने यांची मोठी मुलगी शिवकन्या सोबत २०१४ मध्ये मोठ्या थाटात संपन्न झाला होता. एक वर्ष शिवकन्या व सुनीलचा संसार खूप आनंदी आणी सुखी समाधानी होता. त्यांचे संसार वेलीवर प्रतीक च्या रुपात २०१६ ला गोंडस फुल सुद्धा उमलले होते. त्यानंतर मात्र अचानक सुनीलच्या स्वभावात बदल झाला. आणि तो दारुच्या पुर्णतः आहारी गेला त्यामुळे शिवकन्या माहेरी निघून गेली होती. परंतु तिला संसार न मोडता स्वतःच्या पायावर उभे राहून, मुलास शिक्षण द्यायचे होते म्हणून शिवकन्या ने बारावीनंतर दोन महिन्याचा नर्सिंग असिस्टंटचा कोर्स, प्रथम इन्स्टिट्यूट छत्रपती संभाजी नगर येथे पूर्ण केला. संभाजीनगर येथीलच एका हॉस्पिटलमध्ये एक महिना नोकरीही केली, तिला देऊळगाव राजा शहरातील एका डॉक्टरकडे नर्सिंग असिस्टंट म्हणून काम करायचे होते. नवरा बेवडा असला तरी मुलाचे भविष्य तिला घडवायचे असल्याने ती घटनेच्या पंधरा दिवसापूर्वी नातेवाईकांनी समजावून सांगितल्यामुळे परत सासरी नांदायला आली.सोमवार ३ एप्रिल रोजी मुलगा प्रतीक हा सकाळी शाळेत गेला होता. प्रतीक शहरातील एका कॉन्व्हेंट मध्ये पहिल्या वर्गात शिक्षण घेत होता. साडेदहा वाजता कॉन्व्हेंट ची बस मुलांना घेऊन घरापासून ५० मीटर अंतरावर एका नियोजित स्थळी सोडत होती. त्यामुळे शिवकन्या स्कूलबस थांबण्याच्या ठिकाणी घरापासून काही अंतरावर मुलाला आणण्यासाठी गेली होती. सकाळीच दारू च्या नशेत घरातच असलेल्या, सुनीलला शिवकन्या ही मुलास घ्यावयास गेली हे समजल्यावर तो शिवीगाळ करत दुचाकी घेऊन स्कूलबसच्या स्टॉप वर गेला. तिथे त्याने जोर जोराने शिवकन्या सोबत वाद केला. तू इथे मुलाला घ्यायला का आलीस, मला का सांगितले नाही. असे विविध प्रश्न विचारून सार्वजनिक ठिकाणी त्याने पत्नीच्या थोबाडीत मारल्या आणि रागातच मुलाला दुचाकी वर घेऊन घरी आला. मागून शिवकन्या पायी आली. दोघांमध्ये परत त्यांचे अंगणात वाद झाला. घरात गेल्यावर ही दोघांमध्ये वाद झाला. सुनीलने तिला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. सुनीलचा त्रास असह्य झाल्याने शिवकन्याने त्याच्या थोबाडीत दोन चापटा मारल्या, त्यामुळे सुनील चवताळला .तुला आता जिवंतच ठेवत नाही म्हणत त्याने सरळ साडी ने शिवकन्याचा गळा आवळला. ती अर्धमेली झाल्यावर सुनीलने तिला अचानक सोडले आणि तेवढ्यात शेजारी धावत त्यांच्या घरात पोहोचले. त्यामुळे शिवकन्याने स्वतः गळफास घेतल्याचे त्यांनी शेजाऱ्यांना सांगितले. परंतू मृतक चा प्रत्यक्षदर्शी मुलगा प्रतीक याच्या जबाबात वडील सुनील यांनी दारूच्या नशेत आईचा गळा आवळला तर आजोबा भास्करराव गीते यांनी आईचे पाय पकडले तर आजी चंद्रभागाबाईने हात पकडले, अशा जवाबनुसार आरोपी सुनील चे वडील भास्करराव गीते आणि आई चंद्रभागा गीते या दोघांवरही खुनाच्या कटात सहभागी असल्यामुळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला तर या घटनेत पोलिसांनी भादवी ची ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ ही कलमे समाविष्ट केली. दारू पिऊन पत्नीवर संशय घेऊन कौटुंबिक हिंसाचार करणाऱ्या एका अध्यायाचा अंत शिवकन्याच्या मृत्यूने झाला. पत्नीची हत्या करणारा मारेकरी गजाआड झाला असला तरी, त्याचा एकुलत्या एक मुलगा प्रतीकचा सांभाळ कोण करणार ? हा प्रश्न आहे. प्रतीक हा त्याच्या आजी आजोबांकडे पिंपरी खंदारे येथे आहे. वडिलांचा संशयी स्वभाव आणि दारूचे व्यसन यामुळे तो आई वडिलांच्या प्रेमास मुकला आहे. या घटनेचा तपास देऊळगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार जयवंत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत शिंदे व दत्तात्रय वाघमारे यांनी केला.

## समलिंगी मित्राची पत्नीही त्याच्या ...

कामकाज आटोपल्यानंतर तो आपल्या घरी जाण्याऐवजी सोपानच्या घरी मुक्काम करु लागला. दोघांच्या संबंधाबाबत कुणाला शंका येत नव्हती. प्रदीप घरी आला म्हणजे सोपान त्याला आपल्या खोलीत नेत असे. ऑफीसच्या कामानिमीत्त प्रदीप आला आहे असे सोपान त्याच्या पत्नीला सांगत असे. त्यामुळे ती देखील काही आक्षेप घेत नव्हती. नेहमी नेहमी घरी येणाऱ्या प्रदीपकडे सोपानची पत्नी आकर्षित झाली. सोपानची पत्नी आणि प्रदिप यांच्यातील नजरेच्या खेळात प्रदीपने बाजी मारली. प्रदीपच्या प्रेमाच्या जाळ्यात सोपानची पत्नी अलगद फसली. बघता बघता सोपान आणि सोपानची पत्नी अशा दोघांसोबत प्रदीपने शरीरसंबंध ठेवण्यास सुरुवात केली. सोपानसोबत समलिंगी आणि त्याच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध ठेवणाऱ्या प्रदीपचे आपल्या घराकडे आणि पत्नीकडे दुर्लक्ष होण्यास सुरुवात झाली. सोपानसोबत समलिंगी संबंध केल्यानंतर प्रदीप आपला मोर्चा सोपानच्या पत्नीकडे वळवत असे. दि. ७ एप्रिल २०२३ रोजी प्रदीप नोकरीच्या निमीत्ताने घराबाहेर निघाला. दिवसभर कामकाज केल्यानंतर तो सोपानला भेटण्यासाठी मंठा या गावी गेला. रात्री नऊ वाजता मंठा शहरातील एका बारवर दोघांनी सोबत मद्यप्राशन आणि जेवण केले. प्रदीपने सोपानला मोठ्या प्रमाणात मद्य पिण्यास भाग पाडले. मोठ्या प्रमाणात मद्य घेतल्यामुळे सोपानला काहीही सुचत नव्हते. तो झोकांड्या देत चालत होता. प्रदीपला नेमके हेच हवे होते. प्रदीपने सोपानला तशाच अवस्थेत त्याच्या घरी आणले. मद्याच्या नशेत घरी आणल्यानंतर सोपान लागलीच झोपी गेला. सोपान आता सकाळीच उठणार याची खात्री पटल्यानंतर प्रदीपने आपला मोर्चा सोपानच्या पत्नीकडे वळवला. सोपान मद्याच्या नशेत शुद्ध हरपल्याची संधी साधून प्रदीप आणि सोपानची पत्नी या दोघांनी रतीक्रिडेला सुरुवात केली. दरम्यान रात्री अकरा वाजेच्या सुमारास शेजारीच राहणारा सोपानचा भाऊ प्रकाश त्याठिकाणी आला. त्याने भाऊ सोपान याची पत्नी आणि प्रदीप यांना नको त्या अवस्थेत रंगेहाथ पकडले. दोघे जण रात्रीच्या वेळी एकत्र सापडल्यामुळे सोपानचा भाऊ प्रकाश बोराडे चिडला. त्याने संतापाच्या भरात प्रदीपला मारहाण सुरु केली. रात्रीच्या वेळी सोपानच्या घरी सुरु असलेला गोंधळ ऐकून आजुबाजूचे लोक देखील घटनास्थळी धावून आले. या गोंधळात मद्याच्या नशेत गाढ झोपलेला सोपान जागा झाला. त्याला त्याच्या भावाने घडलेला प्रकार कथन केला. आपल्याला दारु पाजून आपल्या पत्नीसोबत शैय्यासोबत करणाऱ्या प्रदीपचा सोपानला राग आला. सोपानसह त्याचा भाऊ प्रकाश बोराडे, प्रकाशचा मुलगा अक्षय बोराडे आणि शेजारी राहणारा सखाराम बोराडे अशा चौघांनी मिळून प्रदीप कायंदे याला बेदम मारहाण सुरु केली. या बेदम मारहाणीत प्रदीप बेशुद्ध पडला. प्रदीप बेशुद्ध पडल्यानंतर त्याला मारहाण करणारे चौघेजण मनातून घाबरले. प्रदीपला तशाच अवस्थेत मोटार सायकलवर नेवून मार्केट यार्ड परिसरात टाकून देत चौघे जण आपापल्या घरी आले. दरम्यानच्या कालावधीत प्रदीप कायंदे हा मरण पावला. दुसऱ्या दिवशी ८ एप्रिल रोजी शनीवारी सकाळी नऊ वाजता मंठा शहरातील जुन्या जगदंबा मिलनजीक प्रदीप कायंदे याचा मृतदेह लोकांना दिसला. लोकांच्या दृष्टीने प्रदीपचा मृतदेह अनोळखी होता. या घटनेची माहिती समजताच मंठा पोलिस स्टेशनचे पो.नि. संजय देशमुख आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. पोलिस निरीक्षक संजय देशमुख यांनी मृतदेहाची बारकाईने पाहणी केली असता त्यांना मयताच्या शरीरावर जागोजागी मारहाणीच्या जखमा दिसून आल्या. त्यामुळे हा नैसर्गीक मृत्यू नसून हत्या असल्याचे दिसून येत होते. मयताच्या खिशात ओळखपत्र आणि आधार कार्ड पोलिसांना मिळाले. आधार कार्डच्या माध्यमातून मयत प्रदीप कायंदे याची ओळख पटली. मयत हा बुलढाणा जिल्ह्याच्या देऊळगाव राजा तालुक्यातील उंबरखेड येथील प्रदीप भाऊराव कायंदे असल्याचे स्पष्ट झाले. आता प्रदीपचा खून कुणी व कशासाठी केला याचा तपास लागणे महत्वाचे होते. घटनास्थळ आणी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पोलिसांनी तपासणी केली. मात्र सीसीटीव्ही फुटेज अस्पष्ट असल्यामुळे पोलिसांना प्रदीपच्या मारेकऱ्यांचा माग लागत नव्हता. दरम्यान मयताच्या मोबाईलची तपासणी केली असता त्यामधे पोलिसांना अश्लिल फोटो आणि व्हिडीओ मिळून आले. अश्लिल फोटो आणी व्हिडीओ बघून हा काय प्रकार आहे हे पोलिसांना देखील समजत नव्हते. त्यामुळे मयत प्रदीप कायंदे याच्या मोबाईलवर शेवटचा कॉल कुणाचा आला याची पाहणी करण्यात आली. मंठा शहराच्या शांती नगर परिसरातील सोपान बोराडे याचा शेवटचा कॉल मयत प्रदीपच्या मोबाईलवर आला असल्याचे तपासात उघड झाले. त्यामुळे सोपान बोराडे याला चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. मयत प्रदीप कायंदे याच्या मोबाईलमधे आढळून आलेले व्हिडीओ सोपानशी संबंधीत असल्यामुळे पोलिसांनी त्याची सखोल चौकशी केली असता त्याच्याकडून खरा प्रकार समोर आला. समलिंगी आणि अनैतिक संबंधास चटावलेल्या प्रदीप कायंदे याचा चौघांनी खून केल्याचे सोपान याने कबुल केले. मयताचे आपल्यासोबत समलिंगी आणि पत्नीसोबत अनैतिक संबंध असल्याचे सोपान याने पोलिस चौकशीत स्पष्ट केले. मयत प्रदीप कायंदे याचा भाऊ सतिश भाऊराव कायदे याने दिलेल्या फिर्यादीनुसार मंठा पोलिस स्टेशनला संशयीत आरोपी सोपान सदाशिव बोराडे, प्रकाश सदाशिव बोराडे, सखाराम बोराडे आणि अक्षय बोराडे अशा चौघांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. हा गुन्हा दाखल करण्यात आला. मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून अश्लिलता फोफावत असली तरी प्रत्येकाने त्याच्या आहारी जावू नये एवढेच या निमीत्ताने सांगावेसे वाटते.

## शेतीच्या हिश्यावरून मुलाचे डोके ...

शेतीचा अर्धा हिस्सा पाहिजे होता. यासाठी तो वडिलाच्याबरोबर सारखा वाद घालत होता. त्याने वडिलाच्याकडून हात उसणे ऐंशी हजार रूपये घेऊन एक ट्रॅक्टर घेतला. ही रक्कम घेताना त्याने वडिल दादू यांना आपण ही रक्कम परत देतो असे सांगितले होते. त्यामुळे दादू हे सारखे त्याचेकडे आपण दिलेले ऐंशी हजार रूपये परत मागत होते. लक्ष्मण हा काही त्यांना ही रक्कम परत देत नव्हता. उलट माझ्या नावावर शेताचा अर्धा हिस्सा करा असे म्हणत होता. त्यामुळे त्याचेत वाद हा वाढला होता. बऱ्याच वेळेला या वादातून लक्ष्मणने त्यांना मारहाण ही केली होती. त्यामुळे दादू हे काही केल्या लक्ष्मणला दिलेले पैसे सोडायला तयार नव्हते. काही करून ते त्याचेकडून पैसे परत घेणार होता. घरातील या वादात त्याच्या तिसऱ्या पत्नीचा मुलगा अर्जुन हा वडिल दादू याची बाजू घेऊन बोलत होता. सावत्र भाऊ वडिलांचे ऐकून आपल्या अंगावर येत आहे हे बघून लक्ष्मण त्या दोघाच्यावर चिडत होता. लक्ष्मण हा घरात आणि शेतात अर्धी वाटणी मागू लागल्याने दादू यांची चिंता वाढली होते. त्याचे ही वय आता जवळपास ७०च्या घरात होता. आपण जिंवत असे पर्यंत ते घराची आणि शेतीची वाटणी करायला तयार नव्हते. लक्ष्मणला मात्र आपल्या वाटणीची जमीन आपल्या नावावर करून पाहिजे होती. वडिल हयात आहेत तो पर्यत वाटणी झाली तर बरे होईल असा त्याचा विचार होता. त्यामुळे तो सारखा वडिलाच्याकडे मला जमीन माझे नावावर करून दया असा तगादा लावत होता. तो जमीनीची वाटणी मागायला आला की, दादू हे त्याला ट्रॅक्टरसाठी दिलेले ऐंशी हजार परत मागत होते. आधी मी दिलेली रक्कम मला परत दे मग जमीन तुझ्या नावावर करायची की नाही हे बघू असे ते म्हणत होते.त्यामुळे लक्ष्मणला काही सुचत नव्हते. वडिल आपल्याकडे दिलेले पैसे परत मागतात आणि उलट शेतजमीन आणि घर आपल्या नावे करीत नाहीत. त्यातच त्याला कुणकुण लागली होती की, वडिल शेत आणि घर अर्जुनच्या नावे करणार आहेत. त्यामुळे तो वडिलांना मारायला ही गेला होता. त्यावेळी अर्जुनने वडिलांना त्याचे तावडीतून सोडवून लक्ष्मणलाच खरे खोटे बोल सुनावले होते. लक्ष्मणला हल्ली ट्रॅक्टरचे उत्पन्न कमी मिळत होते. शेतात नांगरणीसाठी आणि कोळपणी साठी ट्रॅक्टर नेला की, दिवसभराची त्याची हजेरी ही पडत नव्हती. डिझेलचा खर्च ही त्याचे अंगावर पडत होता. त्यामुळे तो घराच्या कलहाने जास्तच वैतागलेला होता. हल्ली त्याला दारू पिण्याची सवय लागली असल्याने काम कमी आणि खर्च जास्त असे त्याचे झाले होते. हाता तोंडाचा घास पोटाला येत नव्हता. काय करावे आणि काय नको असे त्याचे झाले होते. त्यातच वडिल हे घर आणि शेत नावावर करीत नसल्याने यातून कसा मार्ग काढयाचा याचा तो विचार करीत होता. वडिल हयात असे पर्यत ते शेत आणि घर काही आपल्या नावावर करणार नाहीत याची त्याला खात्री होती. म्हातारा जमीन नावावर करीत नाही उलट दिलेले पैसे परत मागतो काय त्याला आता चांगलीच अद्दल घडवूया असा त्याने विचार केला. त्यातच त्याचा स्वभाव तापट आणि रागीट असल्याने तो आपल्या रागावर नियंत्रण ठेवू शकत नव्हता. बुधवार दि.२४ मे रोजी तो सकाळी सकाळी आपल्या राहत्या घरातून नाश्ता करून बाहेर पडणार होता. त्याला बेडग येथील एका शेतातील नांगरणीचे काम होते. त्यासाठी तो ट्रॅक्टर बाहेर काढणार होता. नेमके त्याच वेळी वडिल त्याच्याकडे आले. त्यांनी त्याला मी दिलेले ऐंशी हजार रूपये परत करतोस की नाही असे विचारले. त्यावेळी त्याचेच आणि वडिलाच्यात वादा वादी झाली. रागाच्या भरात लक्ष्मणने त्यांना तुम्ही जोपर्यत माझ्या नावावर जमीन करणार नाही तोपर्यत मी पैसे परत देणार नाही असे ठणकावून सांगितले. त्यावेळी वडिलांनी त्याला शिवीगाळ करीत तु पैसे परत कसा करीत नाहीस तेच बघतो असे म्हणत तो उपार वस्तीवरून मालगावकडे चालले. ते शेतातून रस्त्यात आल आणि पुढे बघून चालू लागले. तेवढयात मागून लक्ष्मण हा ट्रॅक्टर घेऊन आला. वडिल दादू यांना वाटले त्याचे कुठे तरी काम असेल म्हणून त्याने ट्रॅक्टर बाहेर काढला आहे. ते उपारवस्तीवरून थोडसे पुढे आल्यावर मागून लक्ष्मणने त्याच्या अंगावर ट्रॅक्टर घातला. त्याने ट्रॅक्टर अंगावर घातल्याने ट्रॅक्टरच्या चाकाखाली ते आल्याने पुर्णता चिरडले गेले. त्यात त्याचा चेंदामेंदा झाला. रक्ताच्या थारोळ्यात ते पडले. त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचे अंगावर ट्रॅक्टर घालून लक्ष्मण हा ट्रॅक्टरसह पळून गेला. इकडे शेजारील लोकाच्या लक्षात ही घटना आल्यावर त्यांनी आरडा ओरडा करायला सुरूवात केली. दादू याची तिसरी पत्नी आणि मुलगा यांना या घटनेची माहिती समजताच ते घटनास्थळी आरडा ओरडा करीत आले. अर्जुन याने या घटनेची माहिती लगेच मिरज ग्रामीण पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटना स्थळी दाखल झाले. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी घडवली आहे याची माहिती पोलीसांना मिळाल्याने त्यांच्या तपासाचा मार्ग सोपा झाला होता. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलीसांनी मृतदेह मिरज येथील सरकारी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. या घटनेतील संशयीत आरोपी मयत दादु आकळे याचा मुलगा लक्ष्मण आकळे हा पळून गेल्याने पोलीसांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. घटनेनंतर काही वेळातच पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला मिरज पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता सुरूवातीला तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. परंतु घटना घडत असताना उपार वस्तीवरील लोकांनी बघितले असल्याने पोलीसांनी त्याला बोलते केले. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती त्याने पोलीसांना दिली. वडिल दादू आकळे हे माझ्या नावे शेत जमीन आणि घर करीत नसल्याने व त्यातच ते मला दिलेले हात उसणे ऐंशी हजार परत मागू लागल्याने मला त्याचा राग आला. भांडणात त्यांनी मला शेतजमीन आणि घर माझा सावत्र भाऊ अर्जुन याचे नावे करणार असल्याचे सांगितल्याने माझा तोल गेला आणि मी त्याचे अंगावर रागाने ट्रॅक्टर घातला अशी कबुली त्याने पोलीसांना दिली. या घटनेची मिरज ग्रामीण पोलीसात लेखी फिर्याद अर्जुन आकळे याने दिल्याने त्याच्या फिर्यादी नुसार पोलीसांनी दादू गणपती आकळे (वय ६८) याच्या खून प्रकरणी त्याचा मुलगा लक्ष्मण दादु आकळे (वय ३२) याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ नुसार गुन्हा नोंदवून त्याला मिरज येथील कोर्टात पोलीसांनी हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला ट्रॅक्टर जप्त केला. या घटनेचा पुढील तपास मिरज ग्रामीण पोलीस करीत आहेत. शेत जमीनीसाठी नात्याला काळीमा फासणारी घटना मुलाकडून घडली. त्याने रागाच्या भरात जन्मदात्या वडिलांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून मारले यापेक्षा घोर कलियुग कोणते असेल असे वाटत नाही.

## बोरिवलीमध्ये रात्रीच्या वेळी भलतेच...

५ येथील एका सोसायटीत प्रवीण शांताराम लहाने नावाचा एक तरुण दारूच्या नशेत शिरला. मात्र तिथल्या सुरक्षा रक्षकाने त्याला पकडले आणि आरडा ओरडा केला. तसे सोसायटीतले इतर लोक बाहेर आले. त्यानंतर त्या सर्वांनी प्रवीणला चोर समजून बेदम मारहाण केली. या मारहाणीत प्रवीण गंभीर जखमी झाल्यानंतर पोलिसांना कळवण्यात आले. पोलिसांनी त्याला उपचारार्थ रुग्णालयात नेले, पण तिथे उपचाराच्या दरम्यान त्याचा मृत्यू झाला. दरम्यान चौकशी केली असता प्रवीण हा चोर नसून सांताक्रूझ पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याचा भाऊ असल्याचे समजले. त्यामुळे आता हे प्रकरण गंभीर बनले असून या प्रकरणी कस्तुरबा मार्ग पोलिसांनी जोरसिंग भट, जनक भट या दोन सुरक्षा रक्षकांसह हर्षित गांधी, मनीष गांधी, हेमंत राम्बिया यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

## बापाचे भांडण मुलीसाठी प्राणघातक ...

भट्टीवर अहमदनगर जिल्हयातील लोणी येथील गणेश भाऊसो गटे हे आपली पत्नी पुजा अडीच वर्षाची मुलगी कार्तिकी आणि एक वर्षाचा मुलगा याचे सोबत पोटा पाण्यासाठी गेल्यावर्षी आला. त्या वीट भट्टीवर पश्चिम बंगाल बिबीघाट तालुका नाथपाडा जिल्हा वर्धमान येथील विश्वजीत मंडल उर्फ राजु बिहारी हा ही कामाला आहे. गणेश आणि तो एकाच ठिकाणी कामाला असल्याने त्याची तशी थोडी फार ओळख होती. ते दोघे ही एकाच वीटभट्टीवर कामाला असल्याने काम संपल्यावर दारू प्यायला बसत होते. गणेश हा आपल्या पत्नी मुलासह त्या वीटभट्टीवर राहयला असल्याने त्याची आणि वीटभट्टी मालकाची जास्त घसट होती. तर राजू बिहारी हा कोल्हापूर शहरात फिरस्ता म्हणून राहत असे. तो कधी रंकाळा परिसरात तर कधी व्हिनस कॉर्नर किंवा रेल्वे स्टेशन परिसरात फिरत होता. त्यामुळे त्याला जास्त कुणी ओळखत नव्हते. वीट भट्टी कामगार असल्याने तो ही परराज्यातून आल्याने त्याला वीटभट्टी मालक हा रोजच्या रोज कामाचा पगार देत होता. हा पगार त्याला गणेशपेक्षा कमीच होता. तरी ही तो पोटासाठी तेथे काम करीत होता. हे काम करीत असताना तो कोल्हापूर शहरात किरकोळ कोणाचेच काम करीत असल्याने त्याच्या दारूचा आणि इतर खर्च निघत असे. त्याचे राहण्याचे ठिकाण एक नसल्याने कामावर मालक ही त्याला जास्त किंमत देत नव्हते. संध्याकाळी कामावरून निघताना तो गणेशबरोबर दारू पिण्यासाठी थांबत होता. वीटभट्टीवरील तो कामगार असल्याने गणेशची पत्नी आणि लहान अडीच वर्षाची मुलगी ही त्याला ओळखत होती. कार्तिकीला तो कधी खेळवत असल्याने तिची आणि त्याची जवळीक वाढली होती. गणेश त्याला मित्रासारखा होता. तरी ही त्या दोघांचे कधीच एकमेकांशी पटत नव्हते. विश्वजीत बिहारी तसा कामचुकारू होता. तो जास्त अंगमेहनतीने काम करीत नव्हता. सारखे कामात काही तरी चुका करून मालकाचे नुकसान करीत असल्याने ही बाब गणेशने वीटभट्टी मालकाच्या निदर्शनास आणली. त्यामुळे हल्ली त्याचेत आणि गणेशमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणातून सारखा वाद होऊ लागला. मागे एकदा दोनदा गणेशच्या सांगण्यावरून मालकाने त्याला कमी पगार दिला असल्याचा बिहारीने गैर समज करून घेतला होता. त्यामुळे गणेशशी त्याने वाद घालून भांडण काढले होते. बिहारीचा स्वभाव हा रागीट, तापट आणि भांडखोर होता. त्याने भांडणात गणेशला बघून घेण्याची भाषा केली होती. त्यातच मे महिना अखेरीस वीटभट्टीचा सिझन संपत आल्याने गणेश हा दोन तीन दिवसांनी आपल्या गावी जाणार होता.त्यामुळे गुरूवार दि.१८ मे रोजी तो बायको मुलांना घेऊन कोल्हापूर येथील भवानी मंडपात फिरायला आला. भवानी मंडपात त्याने पत्नी मुलासह अंबाबाईचे दर्शन घेतले. त्यानंतर राजवाडा चौकातील भवानी मंडपात तो पत्नी मुलासह बसला होता. त्याला बालिंगा येथे जायचे होते.तो बसची वाट पहात असताना त्याची अडीच वर्षाची मुलगी कार्तिका ही बाजुलाच खेळत होती. भवानी मंडपातील बस स्टॅन्ड जवळ गर्दी ही होती.अचानक खेळता खेळाता कार्तिका ही बेपत्ता झाली ही गोष्ट काही वेळानंतर गणेश व त्याची पत्नी पुजा याच्या लक्षात आली. त्यांनी तिचा शोध घ्यायला सुरूवात केली. पुजाने तर रडत रडतच गोंधळ केला. आजुबाजुला शोध घेतला तरी कार्तिकी काही सापडली नाही. काही लोकांच्या सांगण्यावरून गणेशने या घटनेची माहिती जुना राजवाडा पोलीस स्टेशन गाठून अडीच वर्षाची मुलगी कार्तिकी ही भवानी मंडपातून खेळता खेळता बेपत्ता झाली किंवा कुणी तरी जाणीवपूर्वक अपहरण केले आहे अशा आशयाची लेखी फिर्याद दिली. भवानी मंडपातून दुपारच्या सुमारास गर्दीतून अडीच वर्षाच्या मुलीचे अपहरण झाल्याचे ऐकून पोलीस ही कोडयात पडले.कारण गणेश हा वीटभट्टी कामगार होता. त्याच्या मुलीचे अपहरण करून त्याचेकडून कुणी कशाला खंडणी मागेल असे पोलीसांना वाटले.या घटनेचा पोलीस तपास करीत असताना त्यांनी या घटनेची सविस्तर माहिती गणेश गटे याच्याकडून घेतली. त्याचे कधी कोणाशी भांडण झाले आहे याची त्याच्याकडे चौकशी करीत असताना त्याने वीटभट्टी कामावरील राजू बिहारी बरोबर आपला वाद झाल्याचे पोलीसांना सांगितले. यावरून पोलीसांनी भवानी मंडप परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरूवात केल्यावर एका कॅमेऱ्यात त्याच्या मुलीला म्हणजे कार्तिकीला राजू बिहारी हा उचलून घेऊन जात असल्याचे दिसले. हे सीसीटीव्ही फुटेज त्यांनी गणेश मेटे आणि त्याची पत्नी पुजा यांना दाखविले असता त्यांनी राजू बिहारीला ओळखले. आता वेळ न दवडता पोलीस कामाला लागले. राजु बिहारी हा परप्रांतीय असल्याने तो कोल्हापूरातून पळून जावू शकतो याची शक्याता पोलीसाना वाटली. त्यांनी राजू हा कुठे कुठे असतो याची माहिती गणेशकडून काढली. त्याने दिलेल्या माहितीनुसार घटनेनंतर अवघ्या तीन तासात पोलीसांनी त्याला रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेतले. त्याला जुना राजवाडा पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे कार्तिकीची चौकशी केली असता सुरूवातीला तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्यातच तो दारू फुल्ल पिला असल्याने त्याला काही सांगता ही येत नव्हते. तो कार्तिकीला कुठे घेऊन गेला हे त्याला नेमके सांगता येत नव्हते. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून सुन्न करणारी माहिती त्याने पोलीसांना दिली. त्याने दिलेली माहिती ऐकून पोलीसांच्या डोळ्यातून ही अश्रु आले. कोवळ्या कार्तिकेला त्याने गोड बोलून तिच्या आई वडिलांची नजर चुकवून भवानी मंडपातून रंकाळा परिसरात आणले.त्याच्या मनात गणेश बरोबर झालेला वाद घुमसत होता.त्याच्यामुळे मालकाने आपल्याला पगार कमी दिल्याचा त्याचा समज होता. गणेशला अद्दल घडवायची तर कार्तिकीचे काही तरी बरे वाईट करायचेच असा विचार त्याने केला.तो त्यावेळी ही फुल्ल दारू पिलेला होता. त्याने कार्तिकीला घेऊन रंकाळ्यासमोरील डी मार्टच्या मागे आला. तेथे अपार्टमेटचे काम सुरू होते.त्या अपार्टमेटमधील पाण्याच्या टाकीत त्याने कार्तिकेला हात पाय उलटे करून टाकले.तिचे हात पाय उलटे केल्यावर ती रडत होती पण त्या नराधमाला तिची जरा ही दया आली नाही. त्यापूर्वी त्याने तिचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. परंतु ती जोर जोरात ओरडू लागल्याने त्याने झटक्यात मागचा पुढचा विचार न करता त्या पाण्याच्या टाकीत तिला सोडले.पाण्याच्या टाकीत पाणी जास्त असल्याने काही वेळात ती पुर्णपणे पाण्यात बुडाली. तिचे रडणे कमी झाल्यावर काय ओळखयाचे त्याने ओळखले आणि कोणच्या काही लक्षात येणार नाही अशा पध्दतीने त्याने त्या पाण्याच्या टाकीवर झाकण ठेवले आणि तेथून तो पसार झाला. आपल्या गावाकडे म्हणजे पश्चिम बंगालला जाण्यासाठी तो रेल्वे स्टेशला आला. तो तेथून पसार होण्यापूर्वीच पोलीसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. घटनास्थळी पोलिस अधिक्षक जयश्री देसाई,शहर पोलीस उपाअधिक्षक मंगेश चव्हाण यांनी भेट देऊन या घटनेची माहिती घेतली. राजू बिहारीने आपला गुन्हा कबुल केल्याने गणेश भाऊसाहेब गटे याने दिलेल्या फिर्यादी नुसार कार्तिकी गटे (अडीच वर्ष) हिच्या खून प्रकरणी विश्वजीत उर्फ राजू बिहारी (वय २२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या घटनेचा तपास पो.निरी सतिश गुरव, पो.उप.निरी. संदीप जाधव, प्रीतमकुमार पुजारी, अनिल ढवळे, प्रशांत घोलप याचेसह डीबीच्या पथकाने करून संशयीत राजू बिहारी याच्या मुसक्या आवळल्या.हल्ली कुणी कोणाचा प्रतिशोध कसा घेईल हेच या घटनेवरून दिसून येते.

29 MAY TO 04 JUNE 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 5/27/2023 8:29 PM Page 1



# कोयत्याच्या धाक दाखवून २० लाखांची बॅग पळवणारा गजाआड



**नाशिक/प्रतिनिधी**

कोयत्याचा धाक दाखवत विस लाख रुपयांची बॅग हिसकावून नेणा-या चोरट्यास एमआयडीसी सिन्नर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने गजाआड केले आहे. आदित्य एकनाथ सोनवणे (रा. शांतीनगर, सिन्नर, मुळ रा. समशेरपूर, ता. अकोले, जि. अहमदनगर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. या घटने प्रकरणी एमआयडीसी सिन्नर पोलीस स्टेशनला भाग ५ गु.र.न. २११/२३ भा.द.वि. ३९२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. दिनांक २० मे २०२३ रोजी सकाळी पावणे सात वाजेच्या सुमारास माळेगाव एमआयडीसी, सिन्नर येथील भगवती स्टिल कंपनीचे कॉन्ट्रक्ट सुपरवायझर चंद्रदीपकुमार सिंग हे त्यांच्या कंपनीतील कामगार दिपचंद्र जयस्वार यांच्या मोटर सायकलवर डबलसिट बसून कंपनीत जात होते. त्यांच्या ताब्यात कामगारांच्या पगाराचे २० लाख ५३ हजार रुपये होते. सिन्नर येथून माळेगाव औद्योगिक वसाहतीत जात असतांना अनोळखी चोरटयाने हातात कोयता घेवून चंद्रदीपकुमार सिंग यांच्या समोर येत त्यांना कोयत्याचा धाक दाखवला. कोयत्याचा धाक दाखवून रोख रक्कम असलेली कापडी पिशवी हिसकावून त्या अनोळखी इसमाने जबरीने चोरुन नेली. या घटने प्रकरणी त्यांनी एमआयडीसी सिन्नर पोलिस स्टेशनला रितसर गुन्हा दाखल केला होता. एमआयडीसी सिन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शाम निकम यांनी आपल्या पथकासह घटनास्थळास भेट देत पाहणी केली. तपासात भगवती स्टिल कंपनीच्या आजुबाजूच्या परिसराची बारकाईने पाहणी केली. फिर्यादी चंद्रदीप कुमार सिंग यांनी कथन केलेल्या हकीकतीनुसार पडताळणी करण्यात आली. एका काळया रंगाच्या पल्सर मोटर सायकलने काळा टी-शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट परिधान केलेल्या इसमाने हा गुन्हा केला असल्याची त्यांची खात्री झाली. पोलीस निरीक्षक शाम निकम यांना संशयीत इसमाच्या वर्णनाप्रमाणे मिळालेल्या माहितीच्या आधारे हा गुन्हा आदीत्य सोनवणे (रा. शांतीनगर, सिन्नर) याने केला असल्याची खात्रीशीर माहीती मिळाली. त्याचा शोध घेतला असता तो घटना घडल्यापासून फरार असल्याचे तपासात उघड झाले. तो सिन्नर येथून त्याच्या पत्नीस घेवून बाहेरगावी वास्तव्यास जाणार असल्याची बातमी पोलीस पथकास मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलीसांनी शांतीनगर परिसरात रात्रभर सापळा रचून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. आदित्य सोनवणे याने आपला गुन्हा कबुल केला. त्याच्याकडून गुन्ह्यातील १८ लाख ९४ हजार ५०० रुपये हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. त्याला अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलिस निरीक्षक शाम निकम करत आहेत.

यातील आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर अहमदनगर जिल्हयात मालाविरूध्दचे गुन्हे दाखल असलेबाबत माहीती मिळाली आहे. सदर आरोपीस चखऊ सिन्नर पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे व उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंग साळवे, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे एमआयडीसी सिन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शाम निकम, सपोनि तुषार गरूड, सपोनि संदेश पवार, पोना भगवान शिंदे, धनाजी जाधव, सागर गिते, नवनाथ चकोर, पोकॉ शशिकांत निकम, विनोद जाधव, चापोकॉ विक्रम टिळे तसेच पोना हेमंत गिलबिले, प्रदीप बहीरम यांचे पथकाने सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.

# उद्गीर येथे 'शासन आपल्या दारी' उपक्रम उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी**

'शासन आपल्या दारी' उपक्रमामुळे शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली थेट मिळत आहे. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यातील अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घेऊन विविध योजनांची माहिती करून घ्यावी. तसेच ज्या योजना तुमच्या आर्थिक विकासासाठी फायद्याच्या आहेत त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार संजय बनसोडे यांनी केले. उदगीर येथे 'शासन आपल्या दारी' उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आ. बनसोडे बोलत होते. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने, उदगीरचे प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. उदगीर आणि जळकोट तालुक्यात शासनाच्या विविध मोठ्या योजनांची कामे सुरु असून त्यात १८२ गावांना शाश्र्वत पाणी पुरवठा ही अत्यंत महत्वाची योजना आहे. या मोठ्या योजनांबरोबरच वैयक्तिक लाभाच्या विविध योजना 'शासन आपल्या दारी' या उपक्रमामुळे आपल्या समोर आल्या आहेत. कृषि आणि कृषि पूरक व्यवसायासाठी विविध महत्वपूर्ण योजनांची माहिती येथील स्टॉलमुळे सर्वसामान्यांना मिळत आहे. त्यामुळे शासनाच्या अशा उपक्रमाला नागरिकांनी मुद्दाम भेट द्यायला हवी, असे मत आमदार श्री. बनसोडे यांनी यावेळी व्यक्त केले. जनतेला विविध कल्याणकारी योजना कळाव्यात, त्यांच्या प्रगतीसाठी शासनाच्या कोणत्या योजनेचा हातभार लागू शकेल, याची माहिती व्हावी, यासाठी 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबविला जात आहे शासनाच्या बहुतांश योजना आता ऑनलाईन झाल्या आहेत, त्यात पारदर्शकता आहे. त्यामुळे नागरिकांनी हे ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी केले. 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम एवढ्या पुरता मर्यादित नसून तो महसूल मंडळस्तरापर्यंत घेऊन जाणार आहोत, असेही जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले. फक्त या शिबिरापुरते नाही तर यापुढे आमचे कर्मचारी गावोगावी जाऊन शासनाच्या ग्रामविकासाच्या योजना लोकांना सांगणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी दिली.

साडेसात हजार लोकांना दिला लाभ उदगीर येथे झालेल्या 'शासन आपल्या दारी' या उपक्रमात जवळपास ७ हजार ५०० लाभार्थ्यांना विविध लाभ आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते देण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, बिरसा मुंडा योजना, रमाई आवास, पंतप्रधान आवास योजना, कृषि विभागाच्या कृषि यांत्रिकीकरणसह विविध योजना, दिव्यांगाच्या योजना, गरोदर स्त्रियांना किट, विहिरींचे अनुदान, विविध प्रकारचे प्रमाणपत्र इत्यादीचे वाटप यावेळी करण्यात आले. लाभार्थ्यांनी व्यक्त केले समाधान..!

# देवणीतून लांब पल्याच्या बस सुरू कराव्यात; उपनगराध्यक्ष अमित मानकरी यांची मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

येथील बस स्थानकावरून लांब पल्लयाच्या आणि देवणी-उदगीर ही सरळ बससेवा सुरू करण्याची मागणी उपनगराध्यक्ष अमित मानकरी यांनी एसटी महामंडळाचे विभागीय नियंत्रक, लातूर यांच्याकडे केली आहे.विभागीय नियंत्रक, लातूर यांना नगरपंचायत देवणी यांच्यातर्फे देण्यात आलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे, देवणी येथून देवणी - हैदराबाद ही बस सेवा सकाळी ८:०० व दुपारी ३:०० वाजता सुरू करावी. तसेच देवणी - पुणे ही सायंकाळी ४:०० वाजता बस सेवा सुरू करावी आणि देवणी बसस्थानकावरून देवणी- उदगीर ही सरळ नवीन बससेवा दिवसातून सहा वेळा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. देवणी तालुका सीमावर्ती भाग असल्याने प्रवाशांची मोठी ये-जा असते. येथे सुप्रसिद्ध बैल बाजार असल्याने पशुधनाच्या खरेदीविक्रीचा वर्षभर व्यवसाय चालतो. यानिमित्त महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश येथील शेतकरी व व्यापारी मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र, प्रवाशांच्या प्रमाणात उदगीर डेपो बससेवा देण्यास असमर्थ ठरत आहे.



**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**निविदा सूचना क्रमांक -०९ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामाच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** कंत्राटदार यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. २२/०५/२०२३ ते दिनांक ०५/०६/२०२३ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण १३ (तेरा) कामे समाविष्ट आहे. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष (जी.एस.टी.वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | पालघर तालुक्यातील पोचाडे उधानपाडा रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ८,१९,९४९/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| २. | पालघर तालुक्यातील बोरशेती कातकरीपाडा रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ८,१९,६७८/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ३. | पालघर तालुक्यातील मौजे रावते गावठणपाडा रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ८,२०,८२९/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ४. | पालघर तालुक्यातील बोरशेती कवळीपाडा (गवळीपाडा) रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ८,२०,३३०/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ५. | वसई तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय, खानिवडे येथील मुख्य इमारतीचे बांधकाम करणे. ता.वसई, जि.पालघर (भुस्तर सर्वेक्षक व तांत्रिक तपासणी करणे - विंधन छिद्र करणे.) | रु. ४,१६,३२४/- | ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च |
| ६. | वसई तालुक्यातील द्विव्यांग व्यक्तीकरीता सोयीसुविधा उपलब्ध करणे व फर्निचर पुरवठा व इतर अनुषंगिक कामे करणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ८,४०,००३/- | ४०५९ शासकीय कार्यालयीन इमारती मोठी बांधकामे |
| ७. | वसई तालुक्यातील न्यायालयीन इमारतीच्या आवारात प्रसाधनगृह बांधणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ५,०६,१४६/- | ४०५९ शासकीय कार्यालयीन इमारती मोठी बांधकामे |
| ८. | वसई तालुक्यातील न्यायालयीन इमारतीच्या परीसरामध्ये गटार बांधणे व चेकर्ड टाईल्स बसविणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ८,३६,९३७/- | ४०५९ शासकीय कार्यालयीन इमारती मोठी बांधकामे |
| ९. | वसई तालुक्यातील न्यायालयीन इमारतीच्या परीसरामध्ये रीटेनर वकिलांसाठी केबीन तयार करणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ४,३२,०९०/- | ४०५९ शासकीय कार्यालयीन इमारती मोठी बांधकामे |
| १०. | वसई तालुक्यातील न्यायालयीन इमारतीच्या बाहेरील बागीच्या करीता कंपाऊंड बांधणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ५,०१,७९३/- | ४०५९ शासकीय कार्यालयीन इमारती मोठी बांधकामे |
| ११. | वसई तालुक्यातील न्यायालयीन इमारतीमध्ये नुतनीकरण करणे व अनुषंगिक सुविधा पुरविणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ७,७५,८२६/- | ४०५९ शासकीय कार्यालयीन इमारती मोठी बांधकामे |
| १२. | पालघर तालुक्यातील भुताळमान ते रावळेपाडा मुख्य रस्ता तयार करणे. (केळवे रोड) ता.जि. पालघर | रु. ८,२५,४८०/- | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम |
| १३. | पालघर तालुक्यातील भुताळमान येथील समाजमंदिर बांधकाम करणे. (केळवे रोड) ता.जि. पालघर | रु. ८,२७,०८८/- | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. २२/०५/२०२३ ते दि. ०५/०६/२०२६ पर्यंत

ई-निविदा सादर करण्याचा दि. ०६/०६/२०२३ सकाळी ११.०० वा. ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०९/०६/२०२३ दुपारी ३.०० नंतर शक्य झाल्यास

<u>**स्थळप्रस्त का.अ.यांनी मंजूर केली आहे.**</u>

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/३८४६

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

सा.बां. विभाग, पालघर

शासकीय विश्रामगृह आवार,

जुना मनोर रस्ता, वेवुर रोड,

पालघर (पुर्व) - ४०१ ४०४.

दिनांक : १५/०५/२०२३

सही/-

**(स. प्र. पाटील)**

कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/३९**

# औसा तालुक्यातील शुभाली परिहार यांचे यूपीएससी परीक्षेत उज्वल यश!

**औसा/शिवाजी मोरे**



औसा तालुक्यातील मा. खासदार तथा कुलगुरू जनार्दन वाघमारे यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या राष्ट्रीय सेवाग्राम स्मृती उद्यान प्रकल्प चलबुर्गा येथील भूमीकन्या शुभाली लक्ष्मीकांत परिहार या विद्यार्थिनीने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशांमध्ये ४७३ वा रँक मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. शुभाली परिहार यांच्या उज्वल यशाबद्दल चलबुर्गा गावचे सरपंच काशीराम परिहार, उपसरपंच विजयाबाई मोरे, सोसायटीचे चेअरमन प्रभाकर शंकर मोरे, बाबुराव मोरे, ग्रामीण जनता शिक्षण संस्थेचे सचिव प्रा दत्तात्रेय सुरवसे, पत्रकार शिवाजी मोरे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष श्याम परिहार, प्रा.लक्ष्मीकांत परिहार, सामाजिक कार्यकर्ते राम कांबळे, पत्रकार जयपाल ठाकूर, संगमेश्वर बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे संचालक दयानंद चव्हाण, औसा राजपूत समाजाचे अध्यक्ष संतोष वर्मा इत्यादींनी अभिनंदन करून शुभाली परिहार यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# लातूर जिल्हा परिषदेच्या सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये लंपी रोगाची औषधे उपलब्ध

**लातूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये लंपी रोग चे रुग्ण तुरळक आढळून येत आहेत. लसीकरण केलेल्या पशुरुग्णांमध्येही लम्पीची लक्षणे दिसून येतात. परंतु ती सौम्य स्वरूपाची असून तीन दिवस उपचार केल्यानंतर पशु बरा होतो. परंतु लसीकरण न झालेल्या पशुधनांमध्ये तीव्र स्वरूपाची लक्षणे दिसून येत आहेत जिल्हा परिषदे अंतर्गत असणाऱ्या सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये लंपी रोगाची औषधे उपलब्ध आहेत. रोग प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी विषाणू प्रतिबंधक फवारणी सुरू करण्यात आलेली आहे. पशुपालकांनी खाजगी पशुवैद्यकाकडे न जाता शासकीय पशुवैद्यकांकडूनच उपचार करून घ्यावेत. सर्व औषधोपचार मोफत आपल्या दारात होतील. ज्या पशुधनाचे लसीकरण झालेले नाही त्या पशुधनास तात्काळ आपल्या नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात नेऊन लसीकरण करून घेण्यात यावे. लंपी रोगाचा प्रादुर्भाव गतवर्षी ऑगस्टमध्ये सुरू झाला. त्यानंतर सप्टेंबर २०२२ अखेर पशुधन संख्येनुसार असणाऱ्या २ लाख ५७ हजार गोवंशीय पशुधनामध्ये एकूण २ लाख ६५ हजार ५९२ इतके लसीकरण पूर्ण झालेले आहे.मार्च २०२३ नंतर लातूर जिल्ह्यामध्ये परत एकदा लंपी रोगाचे पशुरुग्ण दिसून येत आहेत. शिरूर अनंतपाळ तालुक्यातील पाच ते सहा गावांमध्ये अधिक पशुरुग्ण दिसून आले. सप्टेंबर २००० नंतर जन्मलेल्या वासरांमध्ये व नवीन आणलेल्या पशुधनांसाठी लसीकरण सुरू करण्यात आलेले आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी दिली आहे.

क्राईम Reporter

क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉलवर उपलब्ध होईल.

9 8 9 0 7 1 8 8 7 3

## थोडक्यात वृत्तांत

### दिव्यांग बांधवांना युडीआयडी कार्डचे वितरण

लातूर : पत्ता बदलल्यामुळे किंवा चुकल्यामुळे अनेक दिव्यांग बांधवांचे वैश्र्विक कार्ड (युडीआयडी कार्ड) पोस्ट ऑफिसमधून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात परत येत होते. त्यामुळे दिव्यांग बांधवांची होणारी गैरसोय लक्षात घेवून पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली युडीआयडी कार्डचे वितरणाचा कार्यक्रम राबविण्यात आला.जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, समाज कल्याण विभाग आणि विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडी, राजू गायकवाड, सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे बसवराज पैके, परमेश्र्वर सोनवणे, मानसोपचार तज्ज्ञ नवाज शेख, विषय शिक्षक बालासाहेब गंगणे, कर्मचारी व दिव्यांग बांधव, त्यांचे पालक यावेळी उपस्थित होते. युडीआयडी कार्ड तयार असूनही चुकीचा किंवा बदलेल्या पत्त्यामुळे ते दिव्यांग बांधवांपर्यंत पोहचू शकत नव्हते. त्यामुळे विविध योजनांपासून दिव्यांग बांधव वंचित राहत असल्याची बाब जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या लक्षात आल्यानंतर युडीआयडी कार्ड वितरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

### जीएनजी फिल्म कंपनीचा शुभारंभ

लातूर :गोविंद गारकर द्वारा संचालित जीएनजी फिल्म कंपनी या युट्युब चॅनलचे उद्घाटन व उणीव कविपणाची या अल्बम गीताचा लॉन्चिग कार्यक्रम मालपाणी कॉम्प्लेक्स,लातूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गीतकार व पटकथाकार अनिरुद्ध जंगापल्ले होते.प्रमुख अतिथी म्हणून चेअरमन रमेश गोमारे, केंद्रप्रमुख आर.के.जाधव,ॲड.उदय दाभाडे,गीतकार व निर्माते दीपक वजीरे, कास्ट्राईब विभागीय नेते गौतम होसूरकर,नाट्यकर्मी रणजीत आचार्य, संगीतकार शुभम शिंदे उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना गीतकार, अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक गोविंद गारकर यांनी जीएनजी फिल्म कंपनीच्या निर्मितीचे उद्देश सांगत आपण सहकुटुंब पाहता येतील असेच अल्बम गीत बनविणार असल्याचे सांगत उणीव कविपणाची या अल्बम गीताची निर्मिती कथा विशद केली. यावेळी आर.के.जाधव, कवी घारुळे के.टी., गौतम होसूरकर यांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात जंगापल्ले अनिरुद्ध यांनी गीत अतिशय सुमधुर, दर्जेदार झाल्या बद्दल जीएनजी फिल्म कंपनी व टीमचे अभिनंदन केले. याप्रसंगी गीताचे गायक व संगीतकार मिलिंद धनेगावकर, नृत्यदिग्दर्शक मनोज राऊत, कॅमेरामन सुनील घाडगे,कलाकार प्रतिक्षा पाटवकर, भाग्यश्री सुरवसे, प्रवीण येळकर पाटील तसेच गीतकार सचिन सुरवसे, ज्ञानदेव शिंदे, प्रदीप वजीरे, रोहित पोटभरे, मयूर बनसोडे, वैभव गारकर आवर्जून उपस्थित होते. सुत्रसंचलन दगडू गारकर यांनी केले व सोपान शिंदे यांनी आभार मानले

### रिलायन्स लातूर पॅटर्नचे १२वी परीक्षेत यश

लातूर : श्री संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री त्रिपूरा कनिष्ठ महाविद्यालय तथा रिलायन्स लातूर पॅटर्न मधुन या वर्षी ४५३ विद्यार्थ्यांनी १२ वी बोर्ड परीक्षा दिली. यामध्ये चि. आदित्य तेलंग या विद्यार्थ्याने ९१.३३% गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, स्नेहा सालीमठ (८८.००%) व इश्र्वरी देवरे (८६.०५%) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.महाविद्यालयातून ८०% च्या पुढे गुण प्राप्त करणार्या विद्यार्थ्यांमध्ये सारंग पोटे ८३.३३%, शालिनी दिवाने ८२.६७%, माधवी चिपाडे ८१.६७%, झेबा जमादार ८१.१७%, मयुर पिंपळे ८१.००% इ. विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद निकाल प्राप्त केला. तर संस्थेतून २३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, २३८ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये व १८३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण झाले. छएएढ, गएए आणि चक्क्ढ-उएढ साठी आवश्यक असणारी ५०% (झउइ/झउच्) विषयाची अट (ग्रुपींग) एकूण ८६.३५% म्हणजेच ३९३ विद्यार्थ्यांनी साध्य केली. महाविद्यालयाचा विषयनिहाय निकाल - जीवशात्र विषयामध्ये १०० पैकी ९० च्या वर गुण घेणारे १२ विद्यार्थी आहेत, रसायनशास्त्र विषयामध्ये १०० पैकी ९० च्या वर गुण घेणारे ०६ विद्यार्थी, गणित विषयामध्ये १०० पैकी ९० गुणांच्या वर १४ विद्यार्थी, भौतिकशास्त्र विषयामध्ये १०० पैकी ९० च्या वर गुण घेणारे ०६ विद्यार्थी आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# विरोधी पक्षाच्या ऐक्याची सिल्वर ज्युली!

या देशाच्या धर्मनिरपेक्षतेला नख लावणाऱ्या भाजपच्या विरोधात संपूर्ण देशातील जनता आता एकवटत आहे. कारण लोकांना जात धर्म आस्था अस्मिता या पेक्षा पोटापाण्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटतोय. त्यामुळे जाती धर्माच्या राजकारणावर आपले दुकान चलवणाऱ्या कुठल्याही पक्षाला देशातील जनतेचे समर्थन मिळणार नाही. पण त्यासाठी विरोधी पक्ष एकत्र असायला हवा. पण दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही. कारण विरोधी पक्षातील प्रत्येकाला संपूर्ण विरोधी पक्षाच्या ताकती पेक्षा स्वतःच्या पक्षाचा जनाधार वाढवणे महत्वाचे वाटत आहे आणि हेच या देशातील जनतेचे दुर्दैव आहे. संसदेच्या नव्या भवनाच्या उद्घाटन समारंभावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला आहे. पण त्यानिमित्ताने पुन्हा एकदा विरोधी पक्षांमधील फूट बघायला मिळाली आहे. कारण मोदी आणि भाजपचे विरोधक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तेलगू देसम, मायावतींची बसपा, अकाली दल या पक्षांनी संसदेच्या उद्घाटन समारंभात भाग घेण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यातूनच विरोधकांमध्ये असलेली फूट उघडकीस आली आहे. अशा स्थितीत २०२४ मध्ये मोदींच्या विरोधात विरोधी आघाडी कशी काय टिकू शकेल? विरोधी पक्षाच्या ऐक्याचा आतापर्यंतचा इतिहास पाहता आजवर २५ वेळा सर्व विरोधी पक्ष एकत्र आले. पण चार दिवस एकत्र यायचे आणि नंतर पुन्हा आपापल्या वेगळ्या चुली मांडायच्या हेच आजवर बघायला मिळाले आहे. आता २०२४ ची निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या विरोधी पक्षाच्या ऐक्यची ही सिल्वर ज्युबली आहे. पण आताही विरोधी पक्षांचे हे ऐक्य टिकेल असे वाटत नाही. कारण नव्या संसदेच्या इमारतीच्या उद्घाटनाच्या निमित्ताने सर्व विरोधी पक्षांना आपल्या एकजुटीचे दर्शन घडवण्याची संधी होती, पण ती त्यांनी गमावली आहे. राहता राहिला प्रश्न संसदेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन कोणी करायचे याचा? तर राष्ट्रपती या संसदीय मंडळाच्या प्रमुख आहेत. कारण संसदेच्या अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभी भाषणाने होते. शिवाय संसदेच्या दोन्ही सभागृहात संमत झालेल्या ठरावावर राष्ट्रपतींची सही झाल्या खेरीज त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. राष्ट्रपतींचे संसदीय लोकशाहीतील सर्वोच्च स्थान पाहता राष्ट्रपतींच्याच हस्ते नव्या संसद भवनाचे उद्घाटन व्हायला हवे आणि यावेळी तर राष्ट्रपती मुर्मु या आदिवासी समाजाच्या आहेत. एका आदिवासी समाजाची महिला देशाच्या सर्वोच्च पदावर पोहचली याचा देशातील १४० कोटी जनतेला निश्चितच अभिमान आहे. त्यामुळे राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्तेच संसदेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन व्हायला हवे. पण सध्या खाता न वही मोदी कहे वोही सही! अशा पद्धतीने देशाचा कारभार सुरू आहे. त्यामुळे देश विदेशात प्रत्येक ठिकाणच्या कार्यक्रमात मोदीच हवेत असा आग्रह धरला जात आहे आणि याच एकाधिकारशाहीचा विरोधात देशातील विरोधी पक्षांनी आवाज उठवला आहे. त्याला मोदी विरोधी सर्वांची साथ मिळायला हवी. पण मायावती, चंद्राबाबू नायडू यांच्या सारख्या विरोधी नेत्यांना इडीच्या कारवाईची भीती वाटतेय. कारण सत्तेत असताना या लोकांनी जे गैर मार्गाने कमवले आहे ते ईडीच्या कारवाईत जप्त होऊ नये म्हणून हे लोक मोदींना दुखवयला तयार नाहीत. पण यात त्यांचे किती नुकसान होणार आहे याची त्यांना कल्पना नाही. कारण देशात सध्या भाजप विरोधी लाट आहे आणि २०२४ पर्यंत विरोधी पक्ष एकत्र राहिला तर केंद्रात सत्तांतर अटळ आहे. अशावेळी जे मोदींना मदत करणारे लोक आहेत त्यांना जनतेच्या रोषाचा सामना करावा लागेल आणि त्यांचे उरले सुरले अस्तित्वही नष्ट होईल. तसे पाहता चंद्रा बाबू यांचा तेलगू देसंम आणि मायावतींचा बसपा यांचे फारसे अस्तित्व राहिलेले नाही. त्यामुळे ते विरोधी पक्षाच्या सोबत आले काय आणि नाय आले काय फारसा फरक पडत नाही. पण डोक्यात काय आहे या पेक्षा संख्याबळासाठी डोकी महत्वाची असतात. विरोधी पक्षांना त्यांचे संख्याबळ आणि जनतेतील आपली विश्वास अहरता वाढवणे आवश्यक आहे आणि त्यासाठी प्रत्येक वेळी ऐक्याचं तमाशा बनणार नाही याची काळजी घेणे त्यापेक्षाही अधिक महत्वाचे आहे. पण सध्या विरोधी पक्षाच्या ऐक्याची तुलना दलीत ऐक्याशी केली जातेय. रिपब्लिकन पक्षाचे सर्व गट ज्याप्रमाणे आंबेडकर जयंती आणि महापरिनिर्वाण दिनाला एकत्र येतात त्या प्रमाणे निवडणुका आल्या की विरोधी पक्षाच्या ऐक्याची मोटबांधनी सुरू होते आणि यात अर्थातच शरद पवारांचा अधिक पुढाकार असतो. कारण त्यांना फाटा फुटीचा अधिक अनुभव आहे. त्यामुळे त्यांच्यासह काँग्रेस मधले जेवढे फुटीर आहेत ते पवारांच्या सोबतीला असतात आताही आहेत. पण किती दिवस एकत्र राहतील याचा नेम नाही. आज देशात जो जातीय तणाव निर्माण होतोय एका बहुसंख्यांक समाजाकडून अल्पसंख्याक समाजाला टार्गेट केले जातेय. हिंदू राष्ट्राची संकल्पना देशावर लादण्याचा प्रयत्न केला जातोय, त्याला हिंदूंमध्ये असलेल्या विचारवंतांचा विरोध आहे. हिंदू धर्म संकटात आहे अशी जी आवयी उठवली जात आहे ती खोटी आहे हे आता हिंदूंनाही पटायला लागली आहे. म्हणून तर हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकात हिंदुत्ववादी पक्षांचा पराभव झाला. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जीने त्यांना आसमान दाखवले. केजरीवाल यांनी दोन विधानसभा निवडणुकीत त्यांना असा काही दणका दिला की दिल्लीत त्यांना तोंड दाखवायला जागा राहिलेली नाही आणि आता राजस्थान, मध्यप्रदेश व छतीसगड मध्ये सुद्धा तेच होणार आहे. याचा अर्थ लोकांचा मोदी आणि त्यांच्या पक्षावरचा विश्वास उडत चालला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांसाठी हीच नामी संधी आहे. त्यांना २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत जर या संधीचा लाभ घ्यायचा असेल तर सर्व विरोधी पक्षांना एकत्र आणायला हवे आणि २०२४ पर्यंत हे ऐक्य टिकवायला हवे तरच मोदींना सत्तेतून हटवता येईल आणि हा देश, देशातील लोकशाही आणि संविधान वाचवता येईल!

# क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकर...

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावचे रहिवाशी श्रीमती राधाबाई दामोदरराव सावरकर या दांपत्याच्या पोटी १८८३ च्या २८ मे रोजी पुत्ररत्न जन्मले. तेच क्रांतीकारी व क्रांतिकारांचे मसिहा स्वातंत्र्यवीर विनायक दामोदरराव सावरकर तथा स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर होय. त्यांना एक मोठा व एक लहान भाऊ होते तर एक बहीण होती. ते नऊ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले तर वडिलाचे १८९९ साली निधन झाले. ते त्यांचे मोठे भाऊ बाबाराव बरोबर शिक्षणासाठी नाशिकला राहिले होते. त्यांनी एकाच वर्षात तीन इयत्ता पास केल्या होत्या. त्यांना लहानपणापासूनच वाचन लेखन भाषण व कविता करण्याचा छंद होता. त्यांनी लहानपणीच हरिविजय रामविजय रामायण महाभारत भागवत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास इत्यादी वाचून काढले होते. इंग्रज अधिकारी रँडचा खून केल्याच्या आरोपावरून चाफेकर बंधूना फाशीची शिक्षा झाली होती. त्यांच्यावर अवघ्या १५ वर्षाच्या क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर विनायक सावरकरांनी 'फटका' रचला होता. त्यातील काही ओळी

**फाशी ना ती यज्ञवेदिका रक्ते न्हाली जी तुमच्या ।**
**सांडोनी होवो त्याची राष्ट्ररणी सार्थक रक्ताचे तुमच्या ।**
**कार्य सोडोनी अपुरे पडला झुंजत खंती नको पूढे ।**
**कार्य चालवू गिरवूनी तुमच्या पराक्रमाचे आम्ही धडे ।**

क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बालपणीच त्यांच्या घराच्या देवघरात असलेल्या अष्टभुजा देवीसमोर प्रतिज्ञा केली होती की, माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युध्दात शत्रुस मारीन चाफेकरासारखा मरेन किंवा मातृभुमीच्या रक्षणासाठी स्वराज्याचा राज्याभिषेक करविन. यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरे तो झुंजेन.क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर व त्यांच्या कांही मित्रानी मिळून सन १९०० साली मित्रमेळा या नावाची एक संघटना स्थापना केली होती. या मित्रमेळयाचे साध्य होते. स्वातंत्र्य व ध्येय होते. सशस्त्र क्रांती छत्रपती शिवाजी महाराज झाशीची राणी लक्ष्मीबाई लोकमान्य टिळक शि.म.परांजपे वासुदेव बळवंत फडके हे त्यांचे दैवतच होती. मित्रमेळ्याचे कार्य वाढल्याने या संघटनेचे १९०४ मध्ये अभिनव भारत या संघटनेत रूपांतर झाले. अभिनव भारत ही क्रांतिकारांची जगविख्यात क्रांतिकारी संघटना होती.क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकर हे १९०१ साली मॅट्रिकला असताना त्यांचा श्री भाऊसाहेब चिपळूनकरांचे कन्यारत्न श्रीमती यमुनाबाईशी विवाह झाला. विवाहाबध्द झाल्यावर्षीच ते मॅट्रिक पास झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला व राहण्यासाठी फर्ग्युसन कॉलेजच्याच वस्तीगृहात प्रवेश मिळवला. ते निबंध व वक्तृत्व स्पर्धेत भाग घेत असत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजावर कविता लिहिली होती. १९०३ साली त्यांनी स्वातंत्र्याचे स्त्रोत ही कविता लिहिली. सदर कवितेतील काही ओळी अशा आहेत.

**जया स्तुते श्री महन्मंगले शिवास्पदेशुभदे**
**स्वतंत्रे भगवति महंयशोयुतां वंदे**

क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकर हे युवकांचे मसिहा बनले होते. बंगालचे व्हाईसराय कर्झन यांनी बंगालच्या फरळणीचा घाट घातला तेंव्हा बंगालच्या फाळणीचे कट्टर विरोधक व स्वदेशीचे खंदे पुरस्कर्ते असलेल्या क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकराने त्या निषर्धात पुण्यात प्रचंड मोर्चा काढला. त्या मोर्चात लोकमान्य टिळक शि.म.परांजपे असे महारथीही सामिल झाले होते. क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकराने प्रचंड जनसमुदायासमक्ष विदेशी कपड्याची होळी केली. त्यामुळे फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्याने त्यांना वसतिगृहातून काढून टाकले.

क्रांतीकारी स्वातंत्र्यवीर सावरकर १९०५ साली बी.ए.उत्तीर्ण झाले. बॅ.शामजी वर्मा यांनी युरोपात जाऊन शिक्षण घेणार्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती ठेवली होती. क्रांतीकारी स्वातंत्र्यवीर सावरकराने त्या शिष्यवृत्तीसाठी केलेला अर्ज मंजूर झाल्याने ते १९०६ च्या ३ जुलैला लंडनला पोचले व तेथील इंडिया हाऊसमध्ये राहू लागले. ते बायटन येथील समुद्र किनार्यावर बसले असता त्यांना मातृभूमिची आठवण झाली व त्यांनी कविता लिहिली. त्यातील काही ओळी अशा आहेत.

**ने मजसी ने परत मातृभूमिला । सागरा प्राण तळमळला ।।**
**नभी नक्षत्र बहुत एक परी प्यारा । मज मातृभूमिचा तारा ।।**
**प्रासाद तिथे रम्य पर मज भारी । आईची झोपडी प्यारी ।।**
**तिजविण नको राज्य मज प्रिय साचा ।**
**वनवासा जरी तिच्यावनीचा ।।**

अभिनव भारतच्या शाखेतर्फे क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे इंग्लंडमध्येही क्रांतिकारी कार्य चालूच होते. ते भारतातील क्रांतीकारी युवकांना शस्त्रास्त्रे पुरवठा करीत असत. ते शस्त्रास्त्रे घेणेसाठी त्यांचे वडिल बंधु बाबाराव हे मुंबईला गेले असता त्यांच्यावर नजर ठेवून असलेल्या इंग्रज सरकारने त्यांना पकडले व खटला दाखल केला. त्यात त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. इंग्रज सरकारने त्यांना अंदमानाच्या तुरूंगात ठेवले होते. याच अभिनव भारत संघटनेवर इंग्रज सरकारने बंदी घातली होती व त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली होती.क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांना १९१० च्या १३ मार्च रोजी लंडन येथे पकडून कडक बंदोबस्तात 'मोरीया' बोटीने फ्रांस मार्गे भारतात आणत असताना त्यांनी शौचालयाच्या खिडकीतून समुद्रात उडी टाकली पोहत जावून धक्का चढले. फ्रांसच्या भूमित प्रवेश केला. त्यांची मार्सेलिसची उडी जगभर गाजली. ते फ्रांसच्या भुमिवर असल्याने आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे त्यांना इंग्रज सरकारचे पोलीस अटक करू शकत नव्हते. परंतु फ्रेंच पोलिसांनीच त्यांना इंग्रज पोलीसांच्या ताट्यात दिल्याने त्यांना त्याच बोटीने भारतात आणले. भारतातील ज्युरिने त्यांना २०१० च्या २४ डिसेंबर रोजी दोन जन्मठेपेची काळ्या पाण्याची शिक्षा म्हणजे ५० वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. डोंगरीच्या तुरूंगात ठेवलेल्या क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांना महाराजा बोटीने मद्रास मार्गे अंदमानला नेले. आगोदरच जन्मठेपेची शिक्षा झालेले त्यांचे मोठे भाऊ बाबाराव हे तेथेच शिक्षा भोगत होते. क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांना तेल काढण्यासाठी घाणा ओढावा लागत असे व कात्या कुटाव्या लागत असे. जेवण तर फारच निकृष्ठ असे. कधी-कधी भाजीत गोम व सापही निघत असत. त्यांना अनन्वित शारीरीक व मानसिक यातना सहन कराव्या लागल्या आहेत. अंदमानाचा तुरूंग म्हणजे साक्षात यमपुरीच त्यांच्या रोमरोमात भारतनिष्ठा होती. जननी जन्मभूमी स्वर्गादपी असं मानून त्यांनी भारत मातेसाठी असीम त्याग केला व बलिदान दिले.भारत देशाला स्वातंत्र्य करणेसाठी १८५७ साली बाहादूरशाह झाशीची राणी लक्ष्मीबाई नानासाहेब पेशवे तात्या टोपे राजा कुंवरसिंह राजा मानसिंग मंगल पांडे इत्यादी असंख्य जनानी मिळून ब्रिटिशाविरूध्द खूप मोठा लढा दिला. परंतु त्या लढाईत ते हरले. ती मोठी लढाई झाली असतनाही धुर्त ब्रिटिशांनी त्याला १८५७ चे बंड तथा उठाव म्हणून तसा प्रसार केला. क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकराने १८५७ चा संग्राम हा वस्तुनिष्ठ इतिहास लिहून ते १८५७ चे बंड तथा उठाव नव्हता तर तो १८५७ चा संग्राम होता व युध्द होते हे जगाला दाखवून दिले. पहिले महायुध्द संपल्यानंतर भारताने इंग्रज सरकारकडे राजबंद्याच्या सुटकेसाठी जोरदार मागणी लावून धरल्याने इंग्रज सरकारने बहुतांश राजबंधाना सोडले. त्याप्रमाणे ११ वर्षानंतर १९२१ च्या १८ मे रोजी क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांचीही सुटका केली परंतु त्यांना रत्नागिरीत स्थानबध्द ठेवले होते. तरीही त्यांचे सामाजिक कार्य चालूच राहिले. सर्व जातीपंथाच्या लोकासाठी त्यांनी पतीत पावन मंदिर बांधले. त्यांना भेटणेसाठी राष्ट्रपिता म.गांधीजी सपत्नीक गेले होते तेंव्हा महात्माजीने बॉ.ना.म्हटले साध्वी यमुनाबाईना नमस्कार करा. अस्पृश्यांचे उध्दारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीकारकांचे मसिहा नेताजी सुभाषचंद्रजी बोस हे महान नेतेही त्याना भेटनेस गेले होते. माजी पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयीजीने ज्यांना दुर्गा म्हटले त्या दुर्गा व माजी प्रधानमंत्री राष्ट्रमाता श्रीमती इंदिराजी गांधीने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राष्ट्रनिष्ठेची त्यागाची बलिदानाची व स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याची वाखाणगी केलेली आहे.स्वातंत्र्यवीर सावरकरांची २८ मे रोजी १४०वी जयंती आहे. त्या थोर स्वातंत्र्यवीराच्या जयंतीनिमित्त त्यांना भावपूर्ण वंदन व विनम्र अभिवादन!

**अभिवादक : लता युवराज मुमानेमो (९४२०२१२७०१)**

# शंखी गोगलगाय या वर्षी रोखू या!

शंखी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे मागच्या वर्षी शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. या येणाऱ्या हंगामात सोयाबीन आणि इतर पिकांवर शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या लातूर येथील कृषी विद्यावेत्ता विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा.डॉ. अरुण गुडे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी ही माहिती दिली आहे.शंखी गोगलगाय ही किड निशाचर असून रात्रीच्या वेळी सोयाबीन पिकाच्या रोपावस्थेत पिकांचे नुकसान करते.

एकात्मिक नियंत्रण : १. उन्हाळ्यात करावयाची कामे : उन्हाळ्यात खोल नांगरट करून घ्यावी जेणेकरून जमिनीच्या खालच्या थरात लपलेल्या गोगलगायी वरील थरात येऊन कडक उन्हाच्या मदतीने नष्ट होतील.२. प्रतिबंधात्मक उपाययोजना :सोयाबीनच्या पेरणीनंतर पूर्ण शेताभोवती (बांधाच्या आतल्या बाजूने) ०५ सेमी रुंदीचा चुन्याचा पट्टा ओढून घ्यावा.सोयाबीनच्या पेरणीनंतर लगेच बांधाच्या आतल्या साईडने मेटाल्डीहाईड २.५% (स्नेलकिल) या औषधाच्या पेलेटला कट करून बारीक गोळ्यात रुपांतर करावे आणि संपूर्ण शेताच्या भोवती (बांधाच्या आतल्या साईडने) ५ ते ७ फुट अंतरावर एक गोळी टाकावी. स्नेलकिल हे औषध गोगलगायींना आकर्षून घेते आणि गोगलगायीने या गोळीला चाटल्यानंतर ४ ते ५ तासांनी गोगलगायीच्या आतला स्त्राव बाहेर येऊन ती नियंत्रणात येते.३. सोयाबीनच्या उगवणीनंतर : बांधाव्यतिरिक्त आत शेतामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव झाला असेल तर प्रत्येक चार ओळीनंतर ओळीच्या बाजूने ५ फुट अंतरावर स्नेलकिल औषधाच्या गोळ्या टाकाव्यात. ४. सोयाबीन रोपावस्थेत असताना : रात्रीच्या वेळी शेतात गवताचे ढीग किंवा सुतळी बारदाना पाण्यात भिजवून प्रति एकरी दहा ठिकाणी ठेवावा. सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान ढिगाखाली किंवा बारदान्याखाली जमा झालेल्या गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. गोगलगाय नियंत्रणासाठी सामुहिक मोहीम राबवणे आवश्यक. सोयाबीन पिकावरील पिवळा मोझॅक रोगाचे व्यवस्थापन : हा रोग विषाणूजन्ये असून या रोगाची सुरुवात रोगट बियाण्याद्वारे होते आणि पुढील प्रसार (एका झाडापासून दुसऱ्या झाडापर्यंत) पांढऱ्या माशीमुळे होतो. रोगाची लक्षणे :सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरेपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे चट्टे अथवा अनियमित पट्टे दिसतात. फुले आणि शेंगा कमी लागतात. शेंगा पिवळ्या पडून दाना भरत नाही.



उपाययोजना : १. बिगर हंगामी सोयाबीनची लागवड टाळावी.२. सोयाबीनची लागवड बीबीएफ किंवा पट्टा पद्धतीने करावी. ३. वेळोवेळी पिकाचे किड व रोगासाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे. ४. पिवळा मोझॅक प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळून येताच ती उपटून टाकावीत आणि शेताबाहेर खड्डा करून त्यात गाडून टाकावीत. ५. सोयाबीन पिकात पिवळ्या कलरचे चिकट सापळे एकरी ८ ते १० याप्रमाणे लावावेत. ६. रोगाच्या प्रसारास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी पिकावर लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून थायोमिथोक्झाम २५% हे किटकनाशक ४० ग्रॅम प्रति एकरी फवारावे. तूर पिकातील मर व फायटोप्थोरा रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन : पेरणीपूर्वी किंवा पेरणी करताना घ्यावयाची काळजी :१. पिक फेरपालट करणे आवश्यक आहे. २. कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या जाती जशा BDN - ७११, BDN - ७१६, आणि गोदावरी या आधुनिक जातीचा वापर करावा. ३. पेरणीपूर्वी कार्बोक्झीन ३७.५ + थायरम ३७.५ (व्हिटाव्हॅक्स पावर) ०४ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे पहिली बीजप्रक्रिया तर पेरणीच्या दिवशी बायोमिक्स / ट्रायकोडर्मा १० मिली प्रति किलो बियाणे याप्रमाणे दुसरी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे.

जुलै /ऑगस्ट महिन्यात घ्यावयाची काळजी : १. तूर पिकात जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात ज्यावेळी जमिनीत चांगला ओलावा असेल तेव्हा ट्रायकोडर्मा ०४ किलो किंवा बायोमिक्स ०४ लिटर प्रति एकरी २०० लिटर पाण्यातून ड्रेंचींग (आळवणी) द्यावी. सप्टेंबर /ऑक्टोबर महिन्यात घ्यावयाची काळजी (सोयाबीनच्या काढणीनंतर) : १.तूर पिकात खोडावर फायटोप्थोरा ब्लाईटचे राखेरी कलरचे ठिपके दिसताच मिटॅलॅक्झील ४% + मॅन्कोझेब ६४% (रिडोमिल गोल्ड) २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी घ्यावी. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या माहितीचा उपयोग करून घ्यावा. असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून किमान ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ देणार -पालकमंत्री रविंद्र चव्हाण

**पालघर/प्रतिनिधी**




१५ एप्रिल ते १५ जून या कालावधीमध्ये शासन आपला दारी हा महत्त्वकांक्षी उपक्रम संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे या उपक्रमांतर्गत पालघर जिल्ह्यातील किमान ७५ हजार लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ देण्यात येणार आहे असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे शासन आपल्या दारी या उपक्रमाबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी पालकमंत्री श्री चव्हाण बोलत होते. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम साहेब, खासदार राजेंद्र गावित, सर्वश्रीआमदार सुनिल, भुसारा विनोद निकोले जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन, उपजिल्हाधिकारी (सा. प्र) संजीव जाधवर. अन्य मान्यवर उपस्थित होते. शासन आपल्या दारी हा एक उपक्रम पुर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणार आहे पुर्वी. या उपक्रमाचे नाव शासकिय योजनांची जत्रा असे होते नावात बदल करण्यात आला असून आता या उपक्रमाचे नाव शासन आपल्या दारी असे करण्यात आले आहे. उपक्रमाचे उद्दिष्टे आणि अंबलबजावणी यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. राज्य शासन हे सर्वसामान्य नागरिकांचे शासन असून पत्येक जिल्ह्यामध्ये एकाच दिवशी कमीत कमी ७५ हजार सेवा सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या वेगवेगळ्या विभागामार्फत देण्यात येणार आहेत आणि या ७५ हजार सेवा ह्या देतांना आलल्या सर्व विभागाच्या ज्या चालु योजना असतील त्याच योजना या उपक्रमासाठी निवडण्यात आले आहेत. सदर अभियान पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील चार ठिकाणी राबविण्यात येत आहे. अनुक्रमे ३ जून २०२३ रोजी जव्हार मोखाडा , ४ जून २०२३ रोजी डहाणू तलासरी, १० जून २०२३ रोजी वाडा विक्रमगड व पालघर वसई येथे १५ जून २०२३ रोजी राबविण्यात येणार आहे. सर्व लाभार्थ्यांच्या गावनिहाय याद्या ३१ मे पर्यत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. २९ मे २०२३ ते रविवार दि. ४ जून २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# उल्हासनगरमध्ये नवजात बाळांच्या खरेदी-विक्रीचा पर्दाफाश

## डमी ग्राहक बनून पोलिसांकडून भंडाफोड; डॉक्टरांसह पाच जणांना अटक





**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगरमध्ये एक महिला डॉक्टरच नवजात बाळांची लाखो रुपयांना खरेदी विक्री करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. डॉक्टरने लहान मुलांच्या खरेदी विक्रीचा जणू बाजारच मांडला होता. कॅम्प नंबर तीनच्या कंवरराम चौक परिसरात असलेल्या महालक्ष्मी नर्सिंग होम मधील डॉक्टर चित्रा चैनानी या आपल्या टोळीच्या माध्यमातून नवजात बाळाची खरेदी विक्री करत होत्या. या प्रकरणी आरोपी डॉ चित्रा चेनानी सह महिला दलाल असे एकूण पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. उल्हासनगरच्या काही महिला समाजसेविकांना याची माहिती मिळताच त्यांनी बनावट ग्राहकांच्या माध्यमातून या सगळ्या प्रकारचा पर्दाफाश केला आहे. दरम्यान नाशिकहून आलेल्या एका महिलेच्या २२ दिवसाच्या बाळाला सात लाखांना डमी ग्राहकाला विकताना ठाणे क्राईम ब्रांच आणि महिला बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. धक्कादायक म्हणजे मुली आणि मुलांचे वेगवेगळे दर या महिला डॉक्टरने ठरविले होते. पाच जणांवर विविध कलमांतर्गत गुन्हा २२ दिवसांच्या बाळाची विक्री सात लाखात होणार होती. दरम्यान महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यातील टोळी या बाळाची विक्री करणाऱ्या या रॅकेटमध्ये सहभागी आहे.

सध्या महिला बालकल्याण विभाग आणि क्राईम ब्रान्च अधिकारी या सगळ्या घटनेची तक्रार मध्यवर्ती पोलिसात केल्यानंतर पोलिसांनी आरोपी डॉ. चित्र चेनानीसह पाच जणांवर विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून या पाच ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अटक आरोपींना आज कोर्टात हजर करणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सर्व आरोपींविरुद्ध कलम ३७० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाच्या परवानगीने सर्व आरोपींना रात्री अटक करण्यात आली आहे. आज कोर्टात सर्व आरोपींना हजर करणार आहे. रॅकेट कशाप्रकारे चालते? याचा सूत्रधार कोण आहे? अजून कुठे कुठे अशा प्रकाराचे रॅकेट चालवले जाते का? याचा तपास सुरू आहे. चार महिला आणि एका पुरूष आरोपीला अटक करण्यात आला आहे. दोन महिला नाशिकच्या तर पुरूष आरोपी बेळगावचा आहे. पोलीस पुढील तपास करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांनी माहिती दिली आहे. या प्रकरानंतर नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया येत असून आरोपींवर कडक कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

# भिवंडी शहरात नागरी वस्तीत कचरा जाळला जात असल्याने नागरिक हैराण

## आयुक्तांसह ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील नागरी वस्तीच्या मध्येभागीच गर्दीच्या ठिकाण असलेल्या तीन बत्ती परिसरात साईबाबा मार्केट खडक रोड परिसरात मनपाने डम्पिंग ग्राउंड बनविले आहे.या डंपिंग ग्राऊंडवर शहरातील दैनंदिन कचऱ्या बरोबरच तिनबत्ती बाजारपेठचा कचरा या ठिकाणी टाकला जातो. त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. महापालिका प्रशासनाने शहरातील कचरा उचलण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा ठेका देऊन खासगी ठेकेदारांची नेमणूक केली आहे.मात्र ठवकेदार येथील कचरा न उचलता तेथेच जाळून टाकत आहे. त्यामुळे धूर व दुर्गंधीने येथील रहिवासी हैराण झाले आहेत. दिवस रात्र या ठिकाणी कचरा जाळला जात असल्याने वृद्ध व लहान मुलांना श्वसनाचे आजार बळावले असल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या महिला शहाराध्यक्षा स्वाती खान यांनी केला असून ठेकेदार व मनपाचे अधिकारी हा कव्हर जाळून यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप कांबळे यांनी केला असून याप्रकरणी नागरिकांचा जीव जाणीव पूर्वक धोक्यात टाकणाऱ्या भिवंडी मनपा आयुक्त व कचरा ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी स्वाती कांबळे यांनी या डंपिंग ग्राऊंडवर प्रत्यक्ष जाऊन केली आहे.

# भिवंडीत गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या दोघांच्या मुसक्या आवळण्यात भोईवाडा पोलिसांना यश

**भिवंडी/अभिजित हिरे**



भिवंडी पोलिस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात मागील काही दिवसांमध्ये गावठी कट्टा बाळगणाऱ्यांचे प्रमाण वाढले असून पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्यांना पकडण्यात यश मिळत आहे. नुकताच भोईवाडा पोलिसांनी दोघा जणांच्या मुसक्या आवळून त्यांच्या जवळून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात यश मिळविले आहे. भोईवाडा पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक सुरेश घुगे व पथक पोलीस पथकातील पोलीस नाईक नागरे,पोलिस शिपाई कुमार, घुगे हे पोलिस ठाणे हद्दीत गस्त घालीत असताना गोपनिय बातमीदारा मार्फत दोन व्यक्ती हे बेकायदेशिररित्या गावठी कट्टा व जिवंत काडतुसे बाळगुन सुप्रिम हॉटेल,अमिना कंम्पाउंड, भिवंडी येथे येणार असल्या बाबत माहीती मिळाली.पोलिस उपनिरीक्षक सुरेश घुगे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंकुश बांगर यांना ही माहिती दिली.त्यानंतर पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे,सहाय्यक पोलीस आयुक्त राजकुमार डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास सुप्रिम हॉटेल, अमिना कंम्पाउंड या ठिकाणी सापळा रचला असता संशयित मोहम्मद सलामत मोशा शेख, वय ३३ वर्षे, रा.दर्गारोड, फातमा हॉटेल जवळ, हंन्डी कंम्पाउंड, भिवंडी व जावेद असफनदीयार खान (४४), रा.सुप्रिम हॉटेलच्या समोर, अमीना कंम्पाउंड या दोघांना ताब्यात घेत त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या जवळ एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. या प्रकरणी भोईवाडा पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात दोघांना अटक करण्यात आली आहे.

गुन्हयातील आरोपी यांनी जप्त करण्यात आलेला गावठी बनावटीचा कट्टा व जिवंत काडतुसे कोठुन आणले, त्याचा वापर कोण करणार होत, त्यांचे आणखीन कोणी साथीदार आहेत का या सर्वाचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक सुरेश घुगे हे करीत आहेत.

# भिवंडीतील गुंदवली ग्रामपंचायतच्या मंगल कार्यालयाचे उद्घाटन

## शुभ कार्यासाठी मंगल कार्यालय उपलब्ध झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये उत्साह

**भिवंडी/प्रतिनिधी**



तालुक्यातील गुंदवली ग्रामपंचायत मध्ये स्वर्गीय अनंतराव म्हात्रे मंगल कार्यालयाचे उद्धाटन रविवारी शिवसेनेचे नेते प्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख सुरेश बाळ्या मामा म्हात्रे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष डि.के. म्हात्रे,शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख विश्वास थळे,जैष्ठ शिवसैनिक कृष्णकांत कोंडलेकर, आमदार शांताराम मोरे, माजी आमदार योगेश पाटील, माजी आमदार रुपेश म्हात्रे, गुंदवली ग्रामपंचायतीच्या सरपंच चंद्रभागा म्हात्रे, उपसरपंच सुमित म्हात्रे,माजी सरपंच मनेश म्हात्रे यांच्यासह ग्राम पंचायतीचे आजी माजी सरपंच,उपसरपंच व सदस्य तसेच महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील नागरिकांची लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांसाठी मंगल कार्यालयाची अत्यंत आवश्यकता असल्याने गुंदवली ग्रामपंचायत हद्दीत मंगल कार्यालय व्हावे अशी इच्छा सुरेश बाळ्यामामा म्हात्रे यांनी इच्छा व्यक्त केली होती.त्यांच्या मार्गदर्शन व प्रयत्नानेच हे मंगल कार्यालय पूर्णत्वास गेले असल्याचे मत यावेळी माजी सरपंच मनेश म्हात्रे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.भव्य अशा या मंगल कार्यालयात नागरिकांना नाममात्र शुल्कात सर्व सोयी सुविधा ग्राम पंचायतीच्या माध्यमातून पुरविण्यात येणार असल्याने लग्न समारंभाचा खर्च त्यामुळे आटोक्यात येणार असल्याने गावातील नागरिकांसह परिसरातील नागरीकांमध्ये देखील उत्साहाचे वातावरण पसरले आहे. तर गुंदवली गावातील गरीब गरजू नागरिकांसाठी मंगल कार्यालय नसल्याने लग्न समारंभासाठी नागरिकांचा मोठ्या प्रमाणात खर्च होत होता.

या मंगल कार्यालयामुळे गावातील नागरिकांचा लग्न समारंभावरील होणारा खर्च निश्चितच कमी होणार असून, मुलींच्या लग्नासाठी गरीब व गरजू पालकांवर पडणारा आर्थिक ताण या मंगल कार्यालयामुळे निश्चितच कमी होणार आहे. हे मंगल कार्यालय केवळ गुंदवली गावातील नागरिकांसाठीच नसून आजू बाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी देखील खुले आहे असे मत यावेळी शिवसेनेचे भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख सुरेश बाळ्या मामा म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

# वृद्धश्रमातील ज्येष्ठांसोबत केला वाढदिवस साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून मनसे नेते अमित ठाकरे व विद्यार्थी सेनेचे पालघर उपजिल्हाध्यक्ष निखील बागुल यांचा वाढदिवसा वृद्धाश्रमात साजरा करण्यात आला. एकीकडे भरकटत चाललेली तरुणाई तर दुसरीकडे सामाजिक कार्यातून सर्वसामान्य आणि गरजू लोकांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करणारा एखादाच सामाजिक कर्तव्याची जाण असलेला निखिल बागुल सारखा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा तरुण चेहरा नक्कीच तरुणांसाठी आदर्श ठेवणारा आहे.

२४ मे अमितसाहेब ठाकरे व आज २६ निखिल बागुल चा वाढदिवस. मात्र हा वाढदिवस कोणत्याही प्रकारची पार्टी न ठेवता वाडा तालुक्यातील डोंगस्ते येथील राजपूत फाउंडेशन वृद्धाश्रमात पार पाडला. या वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिकांसोबत स्नेहभोजन व केक कापून आपला वाढदिवस साजरा करून आपल्या जवळच्या नातेवाईकांपासून लांब अससेल्या किंवा आपले नातेवाईकच नसलेल्या या वयोवृद्ध नागरिकांसोबत स्नेहभोजन करून त्यांचा आनंद द्विगुणित केला. सदर कार्यक्रमास मनसेचे तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते सदाशिव बागुल, परशुराम भोईर, नितीन ठाकरे मनसेचे उपतालुकाध्यक्ष केशव शेलार, विद्यार्थी सेना उपतालुकाध्यक्ष दिनेश दिनकर, तेजस गोळे, महाराष्ट्र सैनिक व मित्रपरिवार संदीप बागुल, पराग पाटील, भूषण बहाडकर, धीरज भोईर तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतलेले अभिजित बागुल, प्रशांत बागुल, मनीष बागुल, मयूर बागुल आणि राजपूत फाउंडेशनचे कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# औसा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी चंद्रशेखर तात्या सोनवणे, तर उपसभापती पदी प्रा.भिमाशंकर राचाट्टे

**औसा/प्रतिनिधी**



औसा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी चंद्रशेखर तात्या सोनवणे, तर उपसभापती पदी प्रा.भिमाशंकर राचाट्टे एकमुखाने निवड करण्यात आली. औसा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आ.अभिमन्यू पवार यांच्या नेतृत्वाखाली १६ संचालक निवडून आले.

औसा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सभापती आणि उपसभापती या पदांवर विराजमान झाले आहेत. यामध्ये सभापती म्हणून चंद्रशेखर सोनवणे तर उपसभापती म्हणून प्रा. भिमाशंकर राचट्टे यांची निवड करण्यात आली आहे. औसा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती निवडीसाठी सर्व नवनिर्वाचित सदस्यांची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी नाईकवाडी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत सभापती म्हणून चंद्रशेखर सोनवणे तर उपसभापती म्हणून प्रा. भिमाशंकर राचट्टे यांची निवड करण्यात आली. पुढील ५ वर्षामध्ये शेतकरी-व्यापारी-हमाल हिताची ध्येय-धोरणे राबवून नूतन सभापती व उपसभापती, सर्व संचालकांना सोबत घेऊन औसा कृषी उत्पन्न बाजार समितीला जिल्ह्यातील सर्वोत्तम बाजार समिती बनविण्याचा संकल्प सिद्धीस नेतील असा विश्वास सर्व भाजप कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# भिवंडीतील नालेसफाई कंत्राटदाराच्या हलगर्जी कारभाराचा नागरिकांना त्रास



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महापालिकेने नालेसफाईच्या कामांना सुरुवात केली आहे. नालेसफाईसाठी महापालिकेने तब्बल दोन कोटी नऊ लाख रुपयांचा ठेका खाजगी ठेकेदारांना दिलेला आहे.या ठेकेदारांकडून काही दिवसांपासून शहरातील नाल्यांच्या सफाईचे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र आता ही नालेसफाई नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे. नालेसफाई करणारे ठेकेदारांनी शहरातील मुख्य व अंतर्गत नाल्यांच्या सफाईची कामे हाती घेतली असून नालासफाई करताना नाल्यातून काढलेला गाळ चार पाच दिवसांहून अधिक काळ रस्त्यावरच साठवून ठेवला जात आहे. या चिखल मिश्रित गाळातून मोठी दुर्गंधी येत असल्याने परिसरातील नागरिकांसाठी मनपाची नालेसफाई अवघड विषय बनली आहे.

नाले सफाईतून गाळ काढताना कंत्राटदार कोणत्याही प्रकारची औषध फवारणी या चिखल मिश्रित गळावर करत नसल्याने परिसरात मोठी दुर्गंधी पसरत असून शहरातील तीन बत्ती परिसरातील मच्छी मार्केट कडे जाणाऱ्या रस्त्यावर मागील तीन-चार दिवसांपासून नाल्यातून काढलेला गाळ रस्त्यावर तसाच पडून आहे. यातून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याने परिसरातील नागरिक हैराण झाले आहे. येथील दुकानदारांबरोबरच साहित्य खरेदीला आलेल्या नागरिक देखील या दुर्गंधीने नागरिक हैराण झाले आहेत. मात्र मनपा प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांचे या नालेसफाई करणाऱ्या कंत्राटदारांकडे दुर्लक्ष असल्याचा आरोप नागरिक करीत असून नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर मंगळवारी तीनबत्ती परिसरातील गाळ अर्धवट उचलला उचलण्यात आला आहे. मात्र अर्धा चिखल मिश्रित गाळ तसाच रस्त्यावर पडून असल्याने त्यातून मोठी दुर्गंधी परिसरात पसरलेली आहे.

# जैन हिल्स येथे आजपासून राष्ट्रीय फलोद्यान परिषद; 100 शास्त्रज्ञांचा सहभाग

जळगाव : नवीदिल्ली येथील अमितसिंग मेमोरियल फाउंडेशन व जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ते ३० मे दरम्यान जैन हिल्स येथे राष्ट्रीय फलोद्यान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस होणाऱ्या परिषदेमध्ये ११ सत्रात असून जवळपास १०० शास्त्रज्ञ आपले शोधनिबंध सादर करतील. जैन हिल्स येथे होणाऱ्या या परिषदेचे उद्धाटन कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, दिल्लीच्या एएसआरबीचे सदस्य डॉ. मेजर सिंग, माजी सचिव सुरजित चौधरी, ईस्त्राईलचे आंतरराष्ट्रीय सिंचनतज्ज्ञ ॲम्नोन ऑफेन, चाईचे चेअरमन डॉ. एच. पी. सिंग, जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, दिल्ली येथील एनआरएएचे सीईओ डॉ. अशोक दलवाई, झारखंडच्या आयसीएआर-आयएआरआयचे डॉ. विशाल नाथ, माजी सचिव सुरजीत चौधरी यांच्या उपस्थितीत होणार आहे.२८ मे रोजी सायंकाळी (Confederation of Horticulture ssociations of India) CHI चाई'चे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. फलोद्यान म्हणजे विविध फळ पिकावर व भाजीपाला व अन्नधान्य उत्पादनाव वातावरण बदलाचा होणारा परिणाम त्यावर मात करण्यासाठी विविध तंत्रज्ञान क्रॉप कुलींग, टर्मिनल हिट मॅनेजमेंट, अल्ट्रा हायडेन्सिटी,अचूक पाणी व अन्नद्रव्य व्यवस्थापन अशा विविध विषयावर शोधनिबंध सादर करतील.

# राज्याच्या सागरी क्षेत्रामध्ये १ जून ते ३१ जुलैपर्यंत पावसाळी मासेमारी बंदी

पालघर : राज्याच्या सागरी क्षेत्रामध्ये दि. १ जून ते ३१ जुलै या कालावधीमध्ये मासेमारी करण्यास बंदी लागू करण्यात आल्याचे आदेश मत्स्यव्यवसाय विभागाने दिले आहेत. या आदेशात म्हटले की, मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांची जीवित व वित्त यांचे रक्षण करणयाच्या हेतूने महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम १९८१ च्या कलम ४ च्या पोट कलम । द्वारे प्राप्त अधिकारांचा वापर करून दि. १ जून ते ३१ जुलै ( दोन्ही दिवस धरून) राज्याच्या जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आलेली आहे. या कालावधीत मासळीच्या जिवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बिजनिर्मिती प्रक्रियेस वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. तसेच या कालावधीत खराब / वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जीवित व वित्त हानी टाळता येणे शक्य होते. त्यामुळे या कालावधीत यांत्रिक मासेमारी नौकास मासेमारी बंदी लागू करण्यात आली आहे. ही पावसाळी मासेमारी बंदी यांत्रित मासेमारी नौकांना लागू राहील. पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर यांत्रिकी नौकांना लागू राहणार नाही. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मसेमारीबाबतचे धोरण, मार्गदर्शक सूचना, आदेश लागू राहतील. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापर्यंत) यांत्रिक मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करताना आढळल्यास, केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल. तसेच कलम १७ मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करताना यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडुन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिद्ध आहे.

29 MAY TO 04 JUNE 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 5/27/2023 8:31 PM Page 1



## 'शासन आपल्या दारी'ला मिळणार महालाभार्थी पोर्टलची जोड

# अभियानाची व्याप्ती वाढवा, सर्वांना सहजपणे लाभ मिळावेत–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी**

'शासन आपल्या दारी' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महालाभार्थी पोर्टलचा उपयोग करून घेण्यात येणार असून यामुळे या योजनेची व्याप्ती वाढणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत आज एक सादरीकरण करण्यात आले. जास्तीत जास्त नागरिकांना सहज सुलभ लाभ मिळावेत म्हणून या पोर्टलचा देखील उपयोग व्हावा, अशी सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यावेळी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महत्त्वाच्या सूचना केल्या. बैठकीस मुख्य सचिव मनोज सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करिर, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंधारण विभागाचे अपर मुख्य सचिव तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी या अभियानाची जबाबदारी सांभाळणारे मुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव डॉ. अमोल शिंदे यांनी सादरीकरण केले व ही योजना कशारीतीने राबविण्यात येत आहे त्याची माहिती दिली. तर एमकेसीएलतर्फे विवेक सावंत यांनी महालाभार्थी पोर्टलचे सादरीकरण केले. 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरु असून एकाच ठिकाणी एका छताखाली नागरिकांना वेगवेगळे लाभ मिळावेत अशा रीतीने याची योजना करण्यात आली आहे. आता याशिवाय महालाभार्थी पोर्टलमधून नागरिक स्वत: किंवा प्राधिकृत केंद्रावर आपली माहिती भरून सुद्धा योजनेचा लाभ घेऊ शकणार असल्याने याची व्याप्ती वाढेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) यांनी महालाभार्थी' हे पोर्टल तयार केले आहे. नागरिकाने या पोर्टलमध्ये स्वतःची माहिती सादर केल्यानंतर, कोणत्या शासकीय योजनांसाठी हा नागरिक पात्र ठरू शकेल याची एक संभाव्य यादी उपलब्ध होते. या प्रत्येक योजनेसाठी नागरिकाने कोठे संपर्क साधणे अपेक्षित आहे व आवश्यक कागदपत्रे कोणती, याचीही माहिती नागरिकास मिळते. यामुळे नागरिक सहजपणे संबंधित योजनांसाठी अर्ज करू शकतो.

जिल्ह्यातील एमएससीआयटी केंद्र, सीएससी केंद्र, इतर संगणक प्रशिक्षण केंद्र यांना यासाठी प्राधिकृत करण्यात येईल. या केंद्रांच्या नावांना प्रसिद्धी दिली जाईल, जेणेकरून नागरिक जवळच्या केंद्रावर जाऊन महालाभार्थी' पोर्टलवर नोंदणी करून लागू होणाऱ्या शासकीय योजनांची माहिती विनामूल्य मिळवू शकतील. 'महालाभार्थी' पोर्टलवर नोंदणीसाठी केंद्रावर येणाऱ्या नागरिकास केंद्राद्वारे अर्जाचा छापील नमुना दिला जाईल. नागरिकाने स्वतः किंवा स्वयंसेवकाच्या मदतीने हा अर्ज आधार क्रमांकाच्या आधारे महालाभार्थी पोर्टलवर नागरिकाचे खाते तयार करण्यात येईल. संबंधित केंद्राच्या प्रमुखाला महालाभार्थी पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. पोर्टल वापरण्याचे प्रशिक्षण त्यांना देण्यात येईल.

**मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे पत्र**

माहिती भरल्यानंतर पोर्टलद्वारे संबंधित नागरिकास लागू होणाऱ्या संभाव्य योजनांची माहिती देणारे, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे पत्र तयार करून या पत्राची प्रत नागरिकास देण्यात येईल. हे पत्र घेऊन नागरिक संबंधित कार्यालयात जाऊन, योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करून योजनेसाठी अर्ज करू शकेल. किंवा, शासन आपल्या दारी' कार्यक्रमाच्या ठिकाणी जाऊन योजनेचा अर्ज भरेल. या कामी स्वयंसेवक नागरिकास मदत करतील. त्यामुळे नागरिकास आपल्याला लागू योजना व आवश्यक कागदपत्रे यांची योग्य माहिती सहजपणे मिळेल

**स्वयंसेवकांची जबाबदारी**

नागरिकांना जवळच्या प्राधिकृत केंद्रावर जाण्यासाठी प्रोत्साहन देणे. अर्ज भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नागरिक घेऊन जातील याची दक्षता घेणे, छापील अर्ज भरण्यासाठी नागरिकांना मदत करणे, केंद्रावर येणाऱ्या नागरिकांच्या सुविधेसाठी प्रयत्न करणे. नागरिकाला योजनांची माहिती देणारे पत्र मिळाल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष योजनांचा लाभ मिळावा यासाठी पाठपुरावा यासाठी स्वयंसेवक नागरिकांना मदत करतील.

**वाढता प्रतिसाद**

'शासन आपल्या दारी' योजनेसाठी लाभार्थींचा प्रतिसाद वाढत असून संपूर्ण महसूल यंत्रणा तसेच इतर विभागही हिरीरीने यात उतरले आहेत, आणि त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. विशेषत: गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात दोन महिन्यांत एक लाख लाभार्थी झाले असून, कल्याणमध्ये दीड लाख लाभार्थींना लाभ देण्यात येत आहे. पाटण येथे योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ झाला. याठिकाणी देखील लाभार्थींचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. या अभियानासाठी १५ हजार १४६ योजना दूत नेमण्यात आले असून मुख्यमंत्री सचिवालयात मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष' आणि जिल्हा पातळीवर जिल्हा जनकल्याण कक्ष' सुरु करण्यात आले आहेत. या कक्षांच्या माध्यमातून अभियानाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यात येते, समन्वय ठेवण्यात येतो अशीही माहिती देण्यात आली.

पान १ वरून....

### संपत्तीसाठी पत्नीचा छळ करायचा...

१७ मे रोजी सकाळी ९ वाजून ५४ मिनिटांनी भिवापूर येथे हा थरकाप उडवणारा प्रकार घडला. ६० वर्षीय दिलीप सोनटक्के पेट्रोल पंपाचे मालक आहेत. ते दोन कर्मचाऱ्यांसोबत हिशोब करीत बसले होते. त्यावेळी दुचाकीवरुन तिघेजण पेट्रोल पंपाजवळ आले आणि सोनटक्के यांच्यावर सुऱ्याने सपासप वार केले. याशिवाय पेट्रोल पंपावरील १ लाख ३८ हजार पळवून नेले. यानंतर पोलिसांना बोलावण्यात आलं. प्राथमिक तपासात पैशांसाठी हत्या केल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले असता दोघांची ओळख पटली आणि त्यांना ताब्यात घेण्यात आलं. तिसऱ्याचा शोध सुरू होता. मात्र दोन्हीही गुन्हेगार काहीही सांगण्यास तयार नव्हते. तर दुसरीकडे वडिलांची हत्या झाल्यानंतरही पत्नी किंवा मुलं यांनी वडिलांना कोणी मारलं, याची विचारपूसही करायला आले नव्हते. त्यामुळे पोलिसांचा संशय वाढला आणि सोनटक्के कुटुंबाची चौकशी सुरू केली. मृत दिलीप सोनटक्के यांचं वय ६० वर्षे असून पत्नी, मोठी मुलगी आणि मुलगा असा परिवार आहे. गेल्या वर्षभरापासून दिलीप सोनटक्के कुटुंबीयांना त्रास देत होते. हा वाद पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचला होता. त्यानंतर त्यांनी घर सोडलं.सोनटक्के यांचे एका महिलेशी विवाहबाह्य संबंध होते. आणि सोनटक्के त्या महिलेसोबत दुसऱ्या फ्लॅटमध्ये राहत होते. दिलीप सोनटक्के यांची संपत्ती आपल्या हातातून जाईल अशी कुटुंबीयांना भीती होती. शिवाय विवाहबाह्य संबंधाचा रागही त्यांच्या मनात होता. यातून दिलीप सोनटक्के यांच्या मोठ्या मुलीने वडिलांच्या हत्येची पाच लाख रुपयांना सुपारी दिली. दिलीप सोनटक्के यांच्या मोठ्या मुलीचं लग्न झालं असून ती दिव्यांग आहे. सुरुवातीला तिने पोलिसांच्या प्रश्नांची उत्तर देण्यास टाळाटाळ केली. मात्र पोलिसांनी काही तांत्रिक तपास केला आणि त्या आधारावर मुलीला बोलतं केलं. शेवटी तिने वडिलांच्या हत्येची कबुली दिली. सोनटक्के यांच्या हत्येचा सूत्रधार म्हणून मोठ्या मुलीला अटक करण्यात आली आहे. याशिवाय सुपारी घेतलेल्या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

### दारू पाजणाऱ्यांची चुगली करायला...

रवाना केला. मृतदेहाची ओळख पटली नसल्याने तो कोण, कुठला? त्याचा खून कोणी केला? याची माहिती काढण्यासाठी मानपाडा पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी लागलीच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोनिरी (गुन्हे) बाळासाहेब पवार, पोनिरी. अतुल लंबे, सपोनि. सुनिल तारमळे, अविनाश वनवे, सुरेश डांबरे, श्रीकृष्ण गोरे यांची तीन पथके तयार केली .या पथकाला गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने महत्वाच्या सुचना व मार्गदर्शन करुन तपासासाठी शहरात रवाना केले. हे पथक डोंबिवली व मानपाडा शहरात फिरून मृतक व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न करीत होते. अशाच गुप्त बातमी द्वारा मार्फत पोलिसांना माहिती मिळाली की, मयत व्यक्तीचे नाव राजेश रामवृक्ष असुन तो डोंबिवली शहरात मिळेल त्या ठिकाणी बिगारीचे काम करीत होता व त्यास मिळेल त्या ठिकाणी तो झोपत होता, अशी माहिती मिळाली. तसेच तो सोनारपाडा येथे राहणारा दादु जाधव याचेसोबत कधी कधी दारु पित असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पोलिसांचे पथक सोनारपाडा, डोंबिवली पूर्व येथील साईश्रध्दा बिल्डींग मध्ये राहणारा दादु मटु जाधव उर्फ पाटील याच्या घरी धडकले. पथकाने त्याला ताब्यात घेऊन त्याच्या कडे या गुन्ह्याबाबत चौकशी केली. सुरुवातीला 'तो मी नव्हेच' अशी भूमिका घेऊन पोलिसांची दिशाभूल करू लागला. अखेर पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन त्याला बोलते केले. तेव्हा कुठे त्याने गुन्ह्याची कबुली दिली. मृतक राजेश रामवृक्ष हा एकटाच असून तो डोंबिवली शहरात राहत होता. जिथे मिळेल त्या ठिकाणी बिगारीचे काम करीत होता.एकटा जीव सदाशिव असलेला राजेश मिळेल त्या ठिकाणी झोपत होता.दिवसभर बिगारीचे काम करीत असल्याने कामाचा क्षीण घालविण्यासाठी तो रात्री दारू पिऊन मिळेल त्या ठिकाणी झोपी जात असे. राजेश याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने तो दादु जाधव व त्याचा मित्र विनोद पडवळ यांच्या सोबत दारू पित असे. वरून या दोघांच्या तो दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीकडे चुगल्या करत असे. ही गोष्ट दारू विक्रेत्याने दादु जाधव व त्याचा मित्र विनोद पडवळ यांना सांगितली. त्यामुळे या दोघांना राजेशचा राग आला.आपण राजेश याला आपल्या गटात सहभागी करून घेत त्याला दारू पाजतो. त्याचे चोचले पुरवतो. तरी देखील तो आपल्या चुगल्या करून बदनामी करतो? या गोष्टीचा राग अनावर झाल्याने दादु जाधव व त्याचा मित्र विनोद पडवळ या दोघांनी आपसात संगनमत करून राजेशचा काटा काढण्याचा बेत आखला. त्यानुसार २५ मे रोजी राजेश, दादू जाधव व विनोद पडवळ या तिघांनी जेवणाचा मस्तपैकी बेत आखला. जेवण करून तिघेही रात्री दादू जाधव राहत असलेल्या साईश्रध्दा बिल्डींगमधील खोलीत आले.तेथे दादू जाधव व विनोद पडवळ या दोघांनी तू आमच्या सोबत राहून आमच्या चुगल्या करतो.तुला लाज वाटत नाही साल्या. असे म्हणत त्या दोघांनी राजेश याला लाथाबुक्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण केली.या मारहाणीत राजेश जमीनीवर खाली पडला. तो काही हालचाल करीत नसल्याचे पाहुन या दोघांचे पुरती भंबेरी उडाली.त्यांनी हात लावून पाहिले असता राजेश मरण पावल्याचे लक्षात आले. त्यामुळे ते दोघे आणखीनच घाबरून गेले .काय करावे काही सुचेना, प्रकरण आपल्या गळ्याशी येऊ नये म्हणून दादू जाधव व विनोद पडवळ या दोघांनी राजेश याच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला.रात्रीची वेळ असल्याने कोणीच बाहेर नाही याचा कानोसा घेत दादु जाधव व विनोद यांनी राजेश याचे प्रेत रुमच्या खिडकीमधुन बिल्डींगचे खाली फेकुन दिले. त्यानंतर रुममध्ये असलेले रक्ताचे डाग कपडयाने पुसुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे दादू जाधव व विनोद पडवळ या दोघांनी राजेश रामवृक्ष याचा चुगल्या करण्याच्या रागातून खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी दादु मटु जाधव उर्फ पाटील रा.साईश्रध्दा बिल्डींग, दुसरा मजला, फ्लॅट नं. २०३, सोनारपाडा, डोंबिवली (पूर्व) व विनोद राजाराम पडवळ, रा. श्री साई कृपा बिल्डींग, चौथा माळा, रूम नं. ४०१, डोबिवली या दोघांना त्याच दिवशी अटक केली. अगदी २ तासात या गुन्ह्याचा छडा लावून मानपाडा पोलिसांनी या दोघांच्या मुसक्या आवळल्या. ही कामगिरी ठाणे पोलीस आयुक्त जय जीत सिंग, पोलीस सह आयुक्त दत्तात्रय कराळे, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण सचिन गुंजाळ, सहा.पोलीस आयुक्त, डोंबिवली विभाग सुनिल कुराडे, मानपाडा पोलीस ठाण्याचे वपोनि शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनिरी गुन्हे बाळासाहेब पवार, पोनिरी.अतुल लंबे, सपोनि.सुनिल तारमळे, अविनाश वनवे, सुरेश डांबरे, श्रीकृष्ण गोरे पोहवा. राजकुमार खिलारे, शिरीष पाटील, सुनिल पवार, दिपक गडगे, विकास माळी, पोना. शांताराम कसबे, प्रविण किनरे, यलप्पा पाटील, देवा पवार, अनिल घुगे, पोशि. अशोक आहेर,विजय आव्हाड, विनोद ढाकणे, महेंद्र मंजा यांनी केली आहे.

### धमकी दिल्याचा राग उफाळून...

होते. तरी तो त्याचे काही ऐकत नव्हता. त्याच्या आई वडिलांना अक्षय आणि राजेसाब हे दोघे बिघडलेले आहेत आणि त्याच्या सोबत आपला मुलगा असतो हे त्यांना कळाल्यावर ते महांतेशला त्याच्यापासून लांब राहण्यास सांगत होते. पण तो काही त्याचे ऐकत नव्हता. हल्ली तरी तो कामावर ही आणि कॉलेजला जात नसल्याने त्याचे आई वडिल काळजी करीत होते. हल्ली तो रात्री अपरात्री घराकडे येत होता त्यामुळे त्याच्या घरात नेहमी भांडण तंटा होत होता. पुर्णता तो बिघडला आहे याची त्याच्या घरच्यांना कल्पना आली.त्याला आता सरळ मार्गावर कसे आणायचे याचा ते विचार करीत होते. त्यातच तो कधी कोणाबरोबर ही भांडण काढत होता. मागे एकदा तो अक्षयबरोबर दारू पिण्यासाठी बसला असताना त्याच्याबरोबर त्याचा किरकोळ वाद झाला होता. त्यावेळी अक्षयने त्याला बघून घेण्याची भाषा केली असल्याने महातेंशने ही त्याला तुला काय करायचे तर कर जा म्हणत शिवीगाळ करीत दम भरला होता. त्यावेळी त्याचे भांडण हे जोरदारच झाले होते. सगळ्या पार्टीचा विस्कोट झाला होता. त्यानंतर त्या दोघात बोलणे हे बंद झाले होते. रस्त्यात जर आमोरा समोर भेटले तर ही ते दोघे ही एकमेकांकडे खुन्नशी नजरने पाहत होते. दोघातील दुश्मनी वाढली होती. त्यातच त्या दोघांच्या मित्रांनी त्या दोघातील वाद मिटवून त्यांना परत एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत होते. अक्षयच्या मनात मात्र वेगळेच काही तरी होते, महांतेशने आपला अपमान केला आहे. त्याने आपल्याला धमकी दिली. हे तो विसरू शकला नाही त्याला काही ही करून महांतेशचा बदला घ्यायचा होता. त्यामुळे तोच खरे तर मित्राकरवी समेट घडविण्याच प्रयत्न करीत होता. परंतु ही गोष्ट महांतेशच्या लक्षात आली नाही. त्याच्या मित्रांनी ज्यावेळी दोघात समेट करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी त्याने मागचा पुढचा कसला ही विचार न करता परत त्याने मैत्रीसाठी आपला हात पुढे केला. नेमकी हिच गोष्ट अक्षयच्या पथ्यावर पडली होती. एकदा समेट झाल्यावर ते दोघे ही परत दारूच्या पार्टीसाठी एकत्र येवू लागले होते. हल्ली दारू पिण्यासाठी ते रात्रीच्या अंधारात गावातील कन्नड शाळेच्या आवारात बसत होते. वाईन शॉपीमधून दारू घ्यायची आणि मोकळ्या मैदानात अंधारात दारू पित बसायचे हे त्याचे नित्याचेच झाले होते.त्याना अडवणारे ही कुणी नव्हते. गुरूवार दि.१८ मे रोजी रात्री ९च्या सुमारास त्याला अक्षयचा फोन आला. नेहमीप्रमाणे दारु प्यायला त्याने त्याला बोलविले असल्याने महांतेश हा मागचा पुढचा विचार न करता त्याचा फोन आला म्हटल्यावर लगेच आपल्या घरातून बाहेर पडला. इकडे गावातील कन्नड शाळेच्या मैदानावर अंधारात अक्षय त्याचा मित्र राजेसाब मुल्ला आणि आणखी दोघेजण होते. महातेंश तेथे आल्यावर त्यांनी दारू प्यायला सुरूवात केली. अक्षय आणि त्याच्या मित्रांनी अगोदरच महातेंशचा गेम करायचे ठरविले असल्याने त्यांनी मुद्दामच महातेंला जास्त दारू पाजली. पेग वर पेग चढत असताना बोलता बोलता सगळ्याचा तोल जात होता. अक्षयला तर महातेंशचा गेम करायचा असल्याने त्याने आपल्या इतर दोघा तिघांना नजरेने खुणवले.त्यात राजेसाबने महातेंशला तु अक्षयला धमकी कशासाठी दिला होतास असा विषय काढला.त्याने विषय काढल्यावर महातेंशच्या लक्षात आले की, आता येथे काही तरी विपरीत घडणार याचा अंदाज आला.पण त्याला जास्त दारू चढली असल्याने मागचे सगळे विसरून आपण मैत्रीचा हात पुढे केला आहे. मागचे काही उकरून काढू नका असे सांगितले.परंतु अक्षयला त्याचा बदला घ्यायचा असल्याने दारूच्या नशेत तो त्याला शिवीगाळ करायला लागला. तो शिवीगाळ करीत असल्याने महातेंशने ही त्याला शिवीगाळ करायला सुरूवात केली. दोघांचे भांडण हाणामारी पर्यत आले. अक्षयच्या बाजूने राजेसाब आणि दोघेजण असल्याने त्यांनी महातेंशला मारहाण करायला सुरूवात केली. चौघे मिळून त्याला लाथाबुक्कयांनी मारहाण करीत असताना तेथून त्याच्या तावडीतून महातेंश निसटून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना अक्षयने त्याच्या छातीत ठोसा घालून त्याला परत खाली पाडले.आणि त्याच्या शरीरावर आपल्याकडील धारदार चाकूने सपासप सात ते आठ वार केले. त्यासरशी महातेंश हा रक्ताच्या थारोळ्यात ओरडत खाली पडला. तरी त्याला त्या चौघांनी सोडले नाही. अक्षयने वार चालूच ठेवले होते. मोकळ्या मैदानावर तो ओरडत टाचा घासत काही क्षणात निपचिप झाला. त्यावेळी रात्रीचे १२ वाजले असतील आजुबाजूचा अदांज घेऊन अक्षय आणि त्याच्या मित्रांनी तेथून अंधाराचा फायदा घेत तेथून पलायन केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पहाटे फिरायला येणाऱ्या लोकांना कन्नड शाळेच्या मोकळ्या मैदानावर एक तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. त्याच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याने रक्त गोठले होते. शरीरावर मोठया जखमा दिसत होत्या. बघता बघता या घटनेची माहिती गावात समजल्यावर घटनास्थळी लोकांची जर्दी वाढली. तो तरूण गावातीलच असल्याने लोकांनी त्याला ओळखले होते. त्यांनी या घटनेची माहिती मयत महातेंश करुलिंग्नावर याच्या घरच्या लोकांना दिली.ते ही घटनास्थळी धावत पळत आले. महातेंशच्या आईने व बहिणीने मोठयाने अक्रोश केला. कुणी तरी या घटनेची माहिती मारीहाळ पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून मयताची ओळख पटवली. मयत महातेंश हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या शरीरावर सात ते आठ वार झाल्याचे दिसत होते. घटनास्थळी दारूच्या बाटल्या. स्नॅक्स पडले होते. बाजुलाच चप्पला ही पडल्या होत्या. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत महातेंशच्या वडिलाकडून घेतली.रात्री उशिरा तो घरातून बाहेर पडल्याचे त्यांनी सांगितले. महातेंशचे कोणाबरोबर भांडण होते का असे पोलीसांनी त्यांना विचारल्यावर त्यांनी अक्षय कोणीकेरी याच्याबरोबर मागे एकदा भांडण झाल्याचे सांगितले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी वाहतूक व गुन्हे विभागाच्या डीसीपी पी.व्ही. स्नेहा, मार्केटचे एसीपी प्रशांत सिध्दनगौडर, मारीहाळ पोलीस स्टेशनचे पो.निरी. चंद्रशेखर तिगडी यांनी भेट देऊन या घटनेची माहिती घेतली. पोलीसांनी मयत महातेंशचा मोबाईल चेक केला असता त्याच्या फोनवर अक्षय कोणीकेरी याचा फोन आल्याचे दिसून आले. पोलीसांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केल्यावर तो लगेच पोलीसांना सापडला. त्याचेकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता तो उडवाउडवीचे उत्तरे देत होता.पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना देऊन या घटनेतील आपल्या इतर साथीदारांची नावे सांगितली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याच्या साथीदाराचा शोध घ्यायला सुरूवात केली. त्यावेळी राजेसाब मुल्ला पोलीसांना सापडला. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला.या घटनेतील इतर दोघांचा पोलीस शोध घेत होते. परंतु घटना शब्द बध्द होईपर्यत ते पोलीसांना सापडले नव्हते. या घटनेची लेखी फिर्याद मयत महातेंशचे वडिल रूद्राप्पा करुलिंग्नावर यांनी दिल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी महातेंश रूद्राप्पा करूलिंग्नावर (वय २२) याच्या खून प्रकरणी अक्षयकुमार नागाप्पा कोणकेरी (वय २३) आणि राजेसाब हनीफ मुल्ला (वय २२) दोघे ही मारीहाळ आणि त्याच्या इतर दोन साथीदारा विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,३४ सह गुन्हा नोंद करून या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेलगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी अक्षयकहून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.चंद्रशेखर तिगडी यांच्या मार्गदर्शनाखाली मारीहाळ पोलीस करीत आहेत.मनात आणि डोक्यात बदल्याची भावना असली की लगेच त्याला मुर्त रूप दिले जाते. त्यासाठी मागचा पुढचा कुठलाच विचार केला जात नाही ही आजच्या तरूणाईची मानसिकताच आहे असे म्हटले पाहिजे.खटक्यावर बोट आणि जागेवर पलटी अशा पध्दतीने एकाद्याची गेम कशी वाजवली जाते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून....

### पोद्दार हॉस्पिटलच्यावतीने आयोजित ...

पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी डॉ. अशोक पोद्दार यांनी या शिबिराचे आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतल्याबद्दलही त्यांनी डॉ. पोद्दार यांच्याप्रती आभार व्यक्त केले. युवा नेते अभिजित देशमुख यांनीही या उपक्रमास आपल्या शुभेच्छा देताना डॉ. अशोक पोद्दार आणि देशमुख परिवाराचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे असल्याचे नमूद केले. दिवंगत लोंकेटे विलासराव देशमुख यांच्या जयंती आणि पुण्यतिथीचे औचित्य साधून पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने ज्या शिबिरांचे आयोजन केले जातें त्याला तोड नाही,असेही ते म्हणाले. डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना प्रतिवर्षी आपल्या हॉस्पिटलच्या वतीने अशा प्रकारचे शिबीर घेण्यात येते. मात्र यावेळी मोफत अस्थिरोग शिबिराबरोबरच वाहतूक शाखेत कार्यरत असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीरही घेतल्याचे सांगितले. या शिबिरात पोलीस कर्मचाऱ्यांना सर्व क्लिनिकल तपासण्या, रक्त तपासणी, ईसीजी,हाडाच्या ठिसूळतेची तपासणी, एक्सरे, फिजिशियन व अस्थिरोग चिकित्सकांचा सल्लाही मोफत देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. इतर रुग्णांना नेहमीप्रमाणे मोफत अस्थिरोग तपासणी, हाडाच्या ठिसूळपणाची तपासणी, मोफत फिजिओथेरपी, मोफत औषधी देण्यात आली. तसेच रक्त तपासणीत ५० टक्के सूट, डिजिटल एक्सरेमध्ये ५० टक्के सूट देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमात हायटेक च्या डॉ. याडकीकर , डॉ. कुर्डुकर, सिट्रस पॅथॉलॉजी लॅबचे डॉ. मंगेश कुलकर्णी , संचेती हसोफ्तल पुणे व औषधी कंपन्यांचे सहकार्य लाभल्याचे डॉ. पोद्दार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणकेश्र्वर आलमले यांनी केले. या शिबिरात रुग्णांच्या तपासणीसाठी डॉ. निशाद सितूत डॉ. इम्रान कुरेशी, डॉ. पल्लवी जाधव यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसीम कादरी यासह पोद्दार हॉस्पिटलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### लातूर बाजार समितीतील सर्व ...

आले आहे. यावेळी अशोक (गट्टु) अग्रवाल यांनी कै. पांडुरंग लोया, यांच्याकडून या सेवेची प्रेरणा मिळाली असल्याचे सांगत या सेवेसाठी बाजार समितीतील सर्व घटकांच्या वतीने सातत्याने सढळ हाताने मदत करण्यात येते. यावर्षी चाकरवाडी येथे होणाऱ्या समाहासाठी ज्या साहित्याची अधिकची आवश्यकता भासणार आहे ते साहित्य यावर्षी देण्यात येत असल्याचे सांगितले. यानिमित्ताने बाजार समितीतील सर्व घटक एकत्र येऊन सढळ हाताने मदत करतात त्याबद्दल सर्वांचेच आभार मानून आगामी काळातही याउपक्रमांसाठी सर्वांचे सहकार्य लाभले असा विश्र्वास अशोक (गट्टु) अग्रवाल यांनी व्यक्त केला. याप्रसंगी बाजार समितीचे नुतन सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनिल पडिले यांच्यासह नवनिर्वाचीत संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माऊली भक्त ॲड. भालचंद्र पुरी, देविदास गायकवाड, दिगंबर माळवदे, नवनाथ कवितके, पांडुरंग मुंदडा, हुकुमचंद कलंत्री, रमेश सोनवणे, अशोक लोया, गणेश देशमुख, तुळशीराम गंभीरे, हर्षवर्धन सवई, गुलाबराव मोहिते, महेश माने, आनंद मालू, रामलिंग पाटील, चंद्रकांत पाटील, अमर पवार, नेताजी जाधव, रणजित सुर्यवंशी, सतिष भोसले, भास्कर शिंदे, संजय माने, शिवाजी कांबळे आदींसह बाजार समितीतील सर्व घटकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुधीर गोजमगुंडे तर आभार प्रदर्शन तुळशीराम गंभीर यांनी केले.

### लातूर क्रेडाईने सर्वसामान्यांना...

या वेळी बोलताना अमित देशमुख म्हणाले, लातूर शहरातील बांधकामे ही आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय दर्जाची झाली पाहिजे. आता जग जवळ आले आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम बिल्डर्सच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे. नियमानुसार व कायद्याच्या चौकटीत राहून कामे होणे गरजेचे असून, यासाठी कोणालाही कोणाच्या दारात जाण्याची गरज नाही. लातूर शहरात क्रेडाई व लातूर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कचरामुक्त शहर, रेन हार्वेस्टिंग, ग्रीन लातूर ही संकल्पना अस्तित्वात यावी अशी अपेक्षा व्यक्त करून लातूर शहरातील वाहतुकीच्या प्रश्र्नावरही क्रेडाईने शहरात एखादा पार्किंगसाठी पथदर्शी प्रकल्प उभा करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. लातूरची गुणवत्ता शिक्षणामुळे सर्वत्र चर्चिली गेली आहे. तीच गुणवत्ता बांधकाम क्षेत्रातही जोपासली गेली पाहिजे. त्यामुळे ज्याचे चांगले काम आहे त्याला भविष्यात मागणी निश्चितच मिळणार आहे. लातूरला शेजारच्या कर्नाटक, आंध्रप्रदेश व राज्यातील अनेक भागांतून लोक शिक्षणासाठी येत असतात. त्यानंतर अनेकजण येथेच स्थायिकही झालेले आहेत. लातूरकरांना सर्व सोयींनी युक्त सेवा मिळाल्या तर त्याचे निश्चितच लातूरकर स्वागत करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जेवरीकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष उदय पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मावळते अध्यक्ष सुबोध बेळंबे, सचिव महेश नावंदर, नूतन अध्यक्ष जगदीश कुलकर्णी, सचिव संतोष हत्ते, डॉ. धर्मवीर भारती, दीपक कोटलवा, उदय पाटील, किरण मंत्री, उपाध्यक्ष अमोल मुळे, आशीष कामदार, विष्णु मदने, श्रीकांत हिरेमठ, नागनाथ गित्ते, बुमन बिंम्स्च्या रिचा नावंदर, जयनंदा गित्ते आदींनी विशेष प्रयत्न केले.

# सोलापूरचा 'उमेद विभाग' राज्यांत अग्रेसर ठेवा-दिलीप स्वामी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

उमेद अभियानात सोलापूर जिल्हा परिषदेचा उमेद विभाग राज्यांत दुसरे क्रमांकावर आहे. तो राज्यांत अग्रेसर ठेवा असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. सोलापूर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभाग यांचे संयुक्त विद्यमान् बँक कर्ज वाटप व आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन शहरातील निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजन करणेत आले होते. या प्रंसगी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रशांत नाशिककर, संचालक दिपक वाडेवाले, व्याख्यात्ते शिवाजीराव पवार, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, प्रमुख उपस्थित होते. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणे आवश्यक असल्याचे सांगून सिईओ दिलीप स्वामी म्हणाले, महिला सक्षमच आहेत. सर्व बचतगट अध्यक्षा, सचिव अधिक सक्षम झालेस अधिक




कामांना गती येईल. व्यक्तीमत्व विकास हा शेवट पर्यत करता येतो. वाचन, लेखन, पशु पक्षी यांचे पासून ज्ञान मिळते. जिवनाकडे येणारे प्रसंगाकडे सकारात्मक रहा. आपले व्यक्तीमत्व सकारात्मक ठेवा. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले. याची अनेक उदाहरणे देऊन वैयक्तिक व परिसर स्वच्छता ठेवा. असे आवाहन केले.

२८ मे हा जागतिक मासिक पाळी दिवस म्हणून जगात पाळला जातो. या बाबत जागृती करणेची आवश्यकता असल्याचे सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले. ताणतणाव पासून दूर राहणेचा प्रयत्न करा. मासिक पाळी दरम्यान आरोग्याची काळजी घ्या. चांगला सकस आहार घ्या. मासिक पाळी दरम्यान स्वच्छता न राखलेस संसर्ग होणेची शक्यता असते. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले. लोक काय म्हणतील याचा विचार करू नका- बचतगटाचे काम करत असताना लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. कामा मध्ये सहभागी व्हा.मानधन देऊन लोकांची सेवा करायची आहे. साधी राहणे म्हणजे व्यक्तीमत्व विकास - मी कुणाचे नुकसान केले नाही तर आरोग्य बिघडायचे कारणच नाही. निरोगी शरीरात निरोगी मन असते. खुल्या हवेत फिरा. वेळेवर आहार घ्या. सुर्यप्रकाश घ्या. जास्तीत जास्त पाणी प्या. व्यायाम करा. महिलांनो आरोग्याची काळजी घ्या. ज्यात तुम्हाला मन मोकळे वाटते त्या साठी संगीत ऐका. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले. व्याख्यात्ते शिवाजीराव पवार यांनी राष्ट्र उभारणी मध्ये महिलांचे योगदान मोठे आहे. सर्व विविध प्रकारामध्ये उत्कृष्ठ काम केले बद्दल उत्तर सोलापूर तालुका व जिल्हा टीम चा सत्कार करणेत आला. तसेच ११ तालुक्यांत विविध उपक्रम राबवून राज्यांत द्वितीय क्रमांक राबविलेबद्दल सिईओ दिलीप स्वामी यांचे हस्ते सत्कार करणेस आला. सुत्रसंचालन दयानंद सरवळे यांनी केले. आभार जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे यांनी आभार मानले.

## वाडा पंचायत समिती मार्फत आणि शासन स्त्री शक्ती शिबिराचे आयोजन

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा पंचायत समिती मार्फत 'शासन आपल्या दारी' या अभियानांतर्गत महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभागाकडुन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्त्री शक्ती शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. पाठारे मंगल कार्यालय, वाडा येथे दिनांक २९ मे २०२३ रोजी आयोजति करण्यात आलेल्या या शिबीरात तालुक्यातील सर्व शासकीय विभागांकडील महिलांसाठी असणाऱ्या योजनांची माहिती दिली जाणार आहे. तसेच महिलांच्या शासकीय विभागांकडील समस्या असतील त्यांचे निराकरण केले जाणार आहे. ज्या महिलांच्या समस्या असतील त्यांनी समस्या निवारण फॉर्म भरून २९ मे २०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता पठारे मंगल कार्यालय, वाडा येथे उपस्थित रहावे असे आवाहन भाऊसाहेब अंधारे, तहसिलदार वाडा व राजेंद्रकुमार खताळ, गटविकास अधिकारी (उ.) पंचायत समिती वाडा अस्मिता बिर्जे, बाल विकास प्रकल्प अधिकारी वाडा- २ व श्रीम. जे. वसावे, बाल विकास प्रकल्प अधिकारी वाडा-१ महिला व बाल कल्याण विभाग पंचायत समिती वाडा यांनी केले आहे.

## वडोलगावातील नागरिक दूषित पाण्यामुळे त्रस्त; नागरिकांचा महापालिकेवर मोर्चा काढण्याचा इशारा

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगतील वडोल गावात गेली काही महिन्यांपासून दूषित पाणी येत असल्याने तेथील स्थानिक नागरिक त्रस्त झालेत.हे दूषित पाणी पिऊन विविध आजारांना सामोरे जावं लागत आहे. स्थानिक नागरिकांनी महानगर पालिकेला अनेक वेळा निवेदन दिलीत.याकडे दुर्लक्ष करत असल्याने महानगर पालिकेवर मोर्चा काढण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिलीये.उल्हासनगर कॅम्प -३ वडोल गावात पिण्याचं पाणी आणि दूषित पाण्यापासून त्रस्त झालेत. गेल्या दोन महिन्यांपासून दूषित पाणी येत आहे.हे दूषित पाणी पिणार असं अशी समस्या निर्माण झालीये. काही नागरिक हे पाणी गरम करून पीत असल्याने विविध आजारांना सामोरे जावं



लागत आहे. महानगर पालीकेत अनेक निवेदन आणि पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांकडे माहिती दिलीये.परंतु अधिकारी यावर दुर्लक्ष करीत असल्याचं माहिती बहुजन समाज पार्टीचे उल्हासनगर महासचिव अतिश जाधव यांनी दिलीये. महानगर पालिकेने दूषित पाण्याच्या समस्यावर ठोस पावले उचली नाही तर महानगर पालिकेवर धडक मोर्चा काढण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिलाये.

## प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांसाठी मोफत बिस्कीट कॉर्नर



**वाडा/प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य केंद्र वज्रेश्वरी येथे मिशन माणुसकी फाऊंडेशन अंतर्गत रुग्णांसाठी मोफत बिस्कीट कॉर्नर सुरू करण्यात आले आहे. रात्री-बेरात्री अपघात, गरोदर महिला, सर्पदश असे अनेक रुग्ण येत आसतात. रात्रीच्या वेळी दुकाने बंद आसल्याने डॉक्टरांनी औषधे खाण्यास सांगितले की आगोदर काहीतरी खा आणि नंतर गोळ्या औषधे घ्या आसं डॉक्टर सांगत आसतात. त्यावेळी रुग्णांना या बिस्कीटांचा उपयोग करता येईल. मिशन माणुसकी फाऊंडेशनचे प्रमोद पवार, रुपेश जाधव, मिलिंद कांबळे हे अंबाडी, वज्रेश्वरी परिसरात रुग्णांसाठी अनेक उपक्रम राबवत आहेत. अंबाडी नका येथे अवघ्या दोन रुपया मध्ये रुग्णावर उपचार केले जातात. रुग्णांना मोफत रुग्णवाहिका पुरवली जाते.

प्राथमिक आरोग्य केंद्र वज्रेश्वरी हे पालघर ठाणे जिल्ह्याच्या वेशीवर आसलेले गाव आहे.पालघर मधील आदिवासी बांधव वज्रेश्वरी येथे उपचार घेण्यासाठी येतात. अश्या रुग्णांना भूक लागली तर ह्या बिस्कीटचा पोटाला थोडाफार आधार होईल ह्या उद्देशाने हे मोफत बिस्कीट कॉर्नर सुरू करण्यात आले आहे. ह्या उपक्रमामध्ये भूक लागेल त्याने ह्या पेटीतून बिस्कीट काढून खायचे आहे. किंवा ज्याला कोणाला वाटले त्याने ह्या पेटीत बिस्कीट आणून देखील ठेवू शकतो. मधुमेहाच्या रुग्णांसाठी साखर मुक्त बिस्किटांचा देखील समावेश ह्यात केला आहे.

## उल्हासनगरात देशी बनावटीच्या पिस्तूलसह दोघांना अटक; दोन पिस्तूल आणि 10 जिवंत काडतूस जप्त



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगर मध्ये दोन पिस्तूल आणि १० जिवंत काडतूस विक्री करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आलीये.असिफ नसीर शेख व तौफिक हसन शेख असे अटक आरोपींचे नाव आहे. उल्हासनगर गुन्हे अन्वेषण विभागाने ही कारवाई केली.उल्हासनगर गुन्हे अन्वेषण विभागाला गुप्त माहिती मिळाली दोन अज्ञात इसम कॅम्प -५ येथील दूधनाका रोडवर मुकेश वाईन शॉप दुकानाच्या समोर अवैधरित्या देशी पिस्तूल विक्री करण्यासाठी येत आहेत.पोलिसांनी सापळा रचून दोन इसमांना अटक केलीये. त्यांच्याकडून सखोल चौकशी केली असता २ पिस्तूल व १०जिवंत काडतूस जप्त केलीत.असिफ नसीर शेख व तौफिक हसन शेख असं आरोपींचे नाव आहेत.उल्हासनगर गुन्हे अन्वेषण विभागाने करवाई केलीये. उल्हासनगर शहरात या पिस्तूलची विक्री कोणत्या व्यक्तीला करणार होते. याचा शोध पोलीस घेत आहेत.

## थोडक्यात वृत्तांत



### भालकीचे विद्यमान आमदार ईश्वर खंडरे यांचा कॅबिनेट मंत्रिमंडळात समावेश!

**देवणी/शकील मनियार**

महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील भालकी येथील विद्यमान आमदार तथा माजी मंत्री ईश्वर खंडरे यांचा नव्याने स्थापन झालेल्या कॉंग्रेस पक्षाच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांचा समाविष्ट करण्यात आलाआहे त्यांना वन पर्यावरणशास्त्र व पर्यावरण असे महत्त्वाचे खाते देण्यात आली आहेत यांचे औचित्य साधून देवणी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने बोरोळ चौक येथे फटाके फोडून आनंद उत्सव साजरा करण्यात आला याप्रसंगी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते विजयकुमार मानकरी, माजी सरपंच काशीनाथ मानकरी संजय गांधी निराधार योजना माजी अध्यक्ष वैजनाथ लुल्ले, तालुका उपाध्यक्ष बालाजी वळसांगविकार, कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष जावेद तांबोळी, नामदेव मुराळे, शिवा कांबळे, जयमल्हार गायकवाड, बसवराज मंगलगे, बाबुराव कांबळे, मोईज शेख, सुभाष पाटील नदीम मिर्झा, योगेश ढगे, मनोजकुमार लांडगे बाबुराव लांडगे सलीम मिर्झा, महादेव मळभगे, शरण लुल्ले मोईज शेख करीम लाला सादक शेख अरमान तांबोळी सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



### लोखंडी हाईट बॅरेकेटींग अपघाताचे कारण!

भिवंडी : शहरातील अशोक नगर या निवासी संकुलातुन जाणाऱ्या रस्त्यावर स्थानिक नागरिकांनी केलेल्या मागणी नंतर महानगरपालिकेने हा रस्ता अवजड वाहतूकीस बंद केला.त्यासाठी या रस्त्यावर लोखंडी हाईट बॅरेकेटींग लावण्यात आले आहे. दुर्दैव म्हणजे याच हाईट बॅरेकेटींगला एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने हा लोखंडी हाईट बॅरेकेटींग अर्धवट तुटलेल्या अवस्थेत आहे. जर त्यास अजून कोणी धडकल्यास मोठा अपघात होवून जीवितहानी होऊ शकते. या कडे महानगरपालिका प्रशासन लक्ष देणार कधी असा प्रश्न उपस्थित होत आहे.




### हमरापुर येथे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

वाडा : हमरापुर ग्रामपंचायत क्षेत्रातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यासाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. भावी पिढीला कॅरिअर घडवणे म्हणजेच आदर्श गाव बनवणे होईल हेच काम नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच यांच्यामार्फत होत आहे. हमरापूर ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील इ. १० वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यासाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरास मसर्गदर्शक म्हणून प्रदीप शंकरराव साळुंखे लाभले होते. ते मार्गदर्शन करताना म्हणाले कि ईश्वराने आपल्या प्रत्येकाची बुद्धी वेगळ्या पद्धतीने डिझाइन केली आहे. ज्यासाठी बुद्धी डिसाईन केली आहे ते ओळखणे व त्यावर काम करणे हेच करिअरचे गमक आहे. शालेय जीवनातच करिअर समजल्यास विद्यार्थी रस घेऊन अभ्यास करतील असे मोलाचे मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन कॅरियर सेमिनारला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमासाठी सरपंच अवनी सांबरे, उपसरपंच , अजय चौधरी, ग्रामसेविका रिना पिंपळे, सदस्य संदीप गोवारी, प्रांजली पाटील, उन्नती धोडदे हे मान्यवर उपस्थित होते.

# जळगाव पोलिस मुख्यालयातील स्टेशन डायरी ऑनलाईन व्हावी; दीपककुमार गुप्ता यांची मागणी

**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव पोलिस मुख्यालयातील स्टेशन डायरी सीसीटीएनएस प्रणालीत सुरु करुन अद्यावयात करण्याच्या प्रमुख मागणीसह इतर विविध मागण्या, समस्या आणी तक्रारी येथील सामाजीक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता दीपककुमार गुप्ता यांनी केल्या आहे.या बाबतचे पत्र त्यांनी जळगाव पोलिस अधिक्षकांसह राज्याचे पोलीस महासंचालक आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांना देखील पाठवले आहे.

जळगाव पोलीस मुख्यालयातील स्टेशन डायरी ऑनलाईन नसल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांची ड्यूटी लावतांना त्यात पारदर्शकता नसते. दिपककुमार गुप्ता यांना त्यांच्या सुत्रांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे जे पोलीस कर्मचारी कर्मचारी संबंधीतास पैसे देतात त्या कर्मचा-यांना त्यांच्या सोयीनुसार सोयीच्या ठिकाणी ड्यूटी लावली जाते. काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष ड्यूटी न लावता नंतर कागदोपत्री ड्युटी लावून समायोजीत केले जाते. उदाहरणार्थ एखादी आरोपी पार्टी अथवा बंदोबस्त आदी कामासाठी प्रत्यक्षात चार पोलिस कर्मचारी जातात. ते सुरक्षीतरित्या परत आल्यानंतर त्या ड्युटीमधे पैसे देणारे इतर अधिक कर्मचारी ऑफलाईन स्टेशन डायरीसह ड्युटी रजिस्टरला दाखवले जातात असा दीपककुमार गुप्ता यांचा त्यांना त्यांच्या सुत्रांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोप आहे. सामाजीक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता दीपककुमार गुप्ता यांनी पोलिस प्रशासनाला दिलेल्या पत्रातील काही आक्षेप तथा मुद्दे पुढील प्रमाणे आहेत. गरजू कर्मचाऱ्यांना रजेवर सोडण्यासाठी पैसे घेतले जातात. पैसे नाही दिले तर बंदोबस्त, कमी मनुष्यबळ अशी इतर विविध कारणे पुढे करुन रजा नाकारली जाते. चिरीमीरी केल्यानंतर लागलीच रजा मंजूर होत असल्याचे म्हटले जात असल्याचे दीपककुमार गुप्ता यांना त्यांच्या सुत्रांकडून माहिती मिळाली आहे. याशिवाय ज्या भागात बंदोबस्ताची ड्युटी असेल त्या भागातील रहिवासी कर्मचाऱ्याला जबाबदारी न देता हेतु पुरस्सर इतर भागातील कर्मचा-याला त्या ठिकाणी ड्युटी दिली जाते. त्यानंतर ड्युटी रद्द करण्यासाठी पैशांची देवाणघेवाण केली जाते असे म्हटले जाते. उदाहरणार्थ एकाच दिवशी रावेर व चाळीसगाव येथे एखादा बंदोबस्त असल्यास धनाच्या आशेने आणि उद्देशाने चाळीसगावच्या कर्मचाऱ्याला रावेरची ड्युटी आणि रावेरच्या कर्मचाऱ्याला चाळीसगावची ड्युटी दिली जाते. संबंधीत त्रस्त कर्मचाऱ्याने धनराशी दिल्यानंतर सर्वकाही सुरळीत केले जाते असे देखील समजते आणि म्हटले जाते. याशिवाय गरज नसतांना जळगाव पोलीस स्पोर्ट अंतर्गत टेनिस ग्राउंडवर सहा आणि फुटबॉल मैदानावर चार ते सहा कर्मचारी नेमले जात असल्याचे म्हटले जाते. पाणी पिकेटसाठी आठ कर्मचारी नेमले जातात मात्र प्रत्यक्षात त्याठिकाणी एकच कर्मचारी असल्याचे देखील म्हटले जात आहे. लाईन पिकेट साठी देखील सुमारे बारा कर्मचारी नेमले जातात मात्र प्रत्यक्षात त्याठिकाणी एक अथवा दोन कर्मचारी नेमले जात असल्याचे म्हटले जाते. जिमसाठी चार कर्मचारी नेमले जात असले तरी त्याठिकाणी प्रत्यक्षात एक अथवा दोन कर्मचारी असतात असे देखील म्हटले जात आहे. हजेरीवर अधिकाधिक कर्मचारी हजर असणे आवश्यक असताना पंधरा ते विस कर्मचारी हजर असतात असे म्हटले जात आहे. आर्थिक स्त्रोताची सेटींग लावून देणारे काही कर्मचारी रिझर्व ठेवले जातात. अशा सेटींगबाज कर्मचाऱ्यांना जवळपासची कमी श्रमाची ड्युटी लावली जाते असा माहितीचा स्त्रोत गुप्ता यांना मिळाला आहे. बरेच कर्मचारी वर्षानुवर्ष एकाच जागी चिटकून बसले असल्याची काही कर्मचाऱ्यांकडून अंतर्गत ओरड सुरु असल्याचे म्हटले जात आहे. ज्या रजिस्टरमध्ये कर्मचाऱ्यांची ड्युटी लावली जाते त्याची फोटो कॉपी त्याचवेळी (ड्युटी वाटप नंतर लगेचच) पोलीस मुख्यालयाच्या व्हाटस अॅप गृपवर टाकली जात नाही किंवा त्याची एक सत्यापित प्रत जळगाव पोलीस मुख्यालयाच्या दर्शनी भागावर लावली जात नाही. प्रत्यक्ष ड्युटी वर न जाता बहुतेक कर्मचारी त्यांच्या नातेवाईकांच्या नावे घेतलेल्या डंपरद्वारे वाळू व्यवसायात सहभागी असल्याचे देखील म्हटले जात आहे. अशा कर्मचा-यांना त्यांच्या वाळू व्यवसायासाठी पोषक वेळ आणि वातावरण मिळण्याकामी सोयीस्कर ड्युटी पैशांची देवाणघेवाण करुन लावली जात असल्याचा आरोप केला जात आहे. असे कर्मचारी मुख्यालयाची ड्युटी सोडण्यास तयार नसल्याचे देखील म्हटले जात आहे. प्रामाणीक कर्मचा-यांवर हा एकप्रकारे अन्याय असल्याचे देखील म्हटले जात आहे. पोलिस खाते हे शिस्तीचे खाते म्हटले जाते. त्यामुळे अन्याय होत असला तरी कारवाईच्या भितीपोटी काही प्रामाणीक कर्मचारी वरिष्ठांकडे तक्रार करण्यास खुप विचार करतात. अशा प्रामाणीक कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता दीपककुमार गुप्ता यांचे बोट धरले आहे. दीपककुमार गुप्ता यांचे बोट धरुन हे प्रामाणिक पोलिस कर्मचारी आपल्याला न्याय मिळावा अशी अपेक्षा बाळगून आहेत. कुणीतरी अज्ञात व्यक्तीने पोलिस कर्मचारी ललित मोतीराम पाटील याच्याविरुद्ध वरिष्ठांकडे काही तक्रारी केल्या आहेत. या तक्रारी आपण केल्या नसून त्या तक्रारींवर योग्य ती कारवाई व्हावी असे दीपककुमार गुप्ता यांचे म्हणणे आहे. कुणीतरी अज्ञात व्यक्तीने त्या तक्रारी केल्या आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता आणि त्यांचे अवलोकन केले असता सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता दीपककुमार गुप्ता यांनी पोलिस प्रशासनाला विनंती केली आहे की पोलिस मुख्यालयाच्या हजेरीपटावरील कर्मचाऱ्यांसाठी बायोमॅट्रीक थंब पद्धत सुरु करुन कामात पारदर्शकता आणावी. पोलिस मुख्यालयात सीसीटीएनएस प्रणाली सुरु करुन स्टेशन डायरी ऑनलाईन सुरु करावी. जळगाव



पोलीस मुख्यालयातील ज्या रजिस्टरमध्ये कर्मचाऱ्यांची ड्युटी लावली जाते त्याची फोटो कॉपी त्याचवेळी (ड्युटी वाटप नंतर लगेचच) पोलीस मुख्यालययाच्या व्हाटसअॅप गृपवर टाकून त्याची एक सत्यापित प्रत जळगाव पोलीस मुख्यालय दर्शनी भागावर नियमितपणे वेळेवर लावण्यात यावी. तसे संबंधिताना आदेश व्हावे. ड्युटी लावतांना पैशाविना पारदर्शक ड्युटी लावली जावी. बंदोबस्तासाठी कर्मचाऱ्यांना सोयीचे पडेल अशा ठिकाणी त्यांची ड्युटी लावली जावी. गरज नसतांना पैशांच्या आमिषापोटी ड्युटी लावण्यात येणाऱ्या अतिरिक्त पोलिस कर्मचाऱ्यांच्या संखेत कपात करावी. अशा विविध मागण्या सामाजीक तथा माहिती अधिकार कार्यकर्ता दीपककुमार गुप्ता यांनी पोलिस अधिक्षकांसह राज्याचे पोलीस महासंचालक आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांना केल्या आहेत.

# पोद्दार हॉस्पिटलच्यावतीने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात वाहतूक पोलिसांसह १८५ रुग्णांची तपासणी



**लातूर/प्रतिनिधी**

दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ७८ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार हॉस्पिटल ॲक्सीडेन्ट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग शिबिरात वाहतूक शाखेच्या ४८ पोलीस कर्मचाऱ्यांसह एकूण १८५ रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. या मोफत अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी दहा वाजता पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभळगावचे प्राचार्य वैभव कलुबर्मे, लातूरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ.अशोक पोद्दार, युवा नेते अभिजित देशमुख, संचेती हॉस्पिटल पुणेचे मणका विकार तज्ज्ञ डॉ. निषाद सितूत, डॉ. चेतन सारडा, डॉ. विश्रांत भारती, माजी उपमहापौर कैलास कांबळे, रामेश्र्वर सोमाणी, जयेश बजाज, विजय रांदड, संजीव भार्गव यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. डॉ. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने प्रतिवर्षी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंती आणि पुण्यस्मरणाचे औचित्य साधून अशा प्रकारचे मोफत अस्थिरोग व आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येते. पोद्दार हॉस्पिटलमध्ये प्रतिवर्षी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंती व पुण्यतिथीचे औचित्य साधून दिवसभर त्यांच्या भाषणाच्या व्हिडीओ दाखविण्यात येतात. यावर्षीही त्या दाखवण्यात आल्या. व्यक्तिगत पातळीवर डॉ. अशोक पोद्दार हे प्रतिवर्षी मोफत शिबिरांचे आयोजन करतात. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात असा आगळा वेगळा पॅटर्न आणण्याचे कामच मुळी डॉ. अशोक पोद्दार यांनी केले आहे,असे म्हटले तर ते याठिकाणी अतिशयोक्तीचे होणार नाही. वैद्यकीय सेवेबरोबरच सामाजिक कार्यातही डॉ. अशोक पोद्दार कायम अग्रेसर असतात हे सर्वज्ञात आहेच. या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. प्राचार्य वैभव कलुबर्मे यांनी या अस्थिरोग व मोफत आरोग्य शिबिरास आपल्या शुभेच्छा दिल्या. डॉ. अशोक पोद्दार यांच्या अतुलनिय कामाचे वर्णन करण्यास आपल्याकडे शब्दच नाहीत , असे सांगून आपण दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल खूप काही ऐकून होतो. त्यांचे कार्य खूप मोठे आहे. त्यांच्या नगरीत आपल्याला कर्तव्य बजावण्याची संधी मिळाली, ही गोष्ट आपल्यासाठी अत्यंत महत्वाची असल्याचे ते म्हणाले. यावेळी आपले विचार व्यक्त करताना अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी डॉ. पोद्दार यांच्या आरोग्यविषयक कामाचे कौतुक केले. प्रत्येक क्षेत्रात प्रत्येकाला एक तरी चांगला मित्र असावा असे म्हटले जाते. डॉ. पोद्दार यांचे हे कार्य पाहून त्यांच्यारूपाने आरोग्य - वैद्यकीय क्षेत्रातही आपले मित्र आहेत ही बाब अत्यंत मोलाची असल्याचे देवरे यांनी बोलून दाखविले. वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी यावेळी बोलताना ...पान ६ वर

# लातूर बाजार समितीतील सर्व घटकांच्या वतीने चाकरवाडी अखंड हरिनाम सप्ताहास दोन ट्रक धान्य



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने चाकरवाडी येथे पार पडणार्या अखंड हरिनाम सप्ताहास सर्व घटकांच्या वतीने अन्नधान्य सेवा देण्यात येते. गेल्या वीस वर्षापासून सुरु असलेल्या परंपरेनुसार याहीवर्षी जिल्हा उपनिबंधक सच्चिदानंद नाईकवाडे, सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनिल पडिले यांच्यासह सर्व घटकांच्या उपस्थितीत दोन ट्रक धान्य चाकरवाडीकडे झेंडा दाखवून रवाना करण्यात आलेले आले. लातूर उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व घटक विविध माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात. वेगवेगळ्या सामाजिक, धार्मिक कार्यक्रमासाठी या घटकांच्या वतीने सातत्याने मदतीची ओघ सुरु असतो. त्या अनुषंगानेच बीड जिल्ह्यातील चाकरवाडी येथे पार पडणार्या अखंड हरिनाम सप्ताहास सर्व घटकांच्या वतीने अन्न-धान्य सेवा करण्यात येते. या सेवेचे हे २१ वे वर्ष असून चाकरवाडी येथे हा हरिनाम सप्ताह दि. २७ मे रोजी सुरु होणार असून त्याची सांगता दि. ३ जून रोजी होणार आहे. या निमित्ताने होणार्या महापंगतीसाठी यावर्षी बाजार समितीतील सर्व घटकांच्या वतीने तब्बल दहा लाख रूपयांचे अन्न-धान्य देण्यात येत आहे. सदर साहित्य आज दि. २४ मे रोजी चाकरवाडीकडे जिल्हा उपनिबंधक सच्चिदानंद नाईकवाडे, बाजार समितीचे नुतन सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनिल पडिले, बाजार समितीचे सचिव भगवान दुधाटे, बालाप्रसाद बिदादा, अशोक (गट्टु) अग्रवाल, माजी सभापती ललीतकुमार शहा यांच्यासह सर्व घटकांच्या उपस्थितीत दोन ट्रकला झेंडा दाखवून चाकरवाडीकडे रवाना करण्यात ...पान ६ वर

# भिवंडीत ग्रामपंचायतीच्या ११ पोट निवडणुकीचा निकाल जाहीर; ६ बिनविरोध तर एक नशिबाच्या चिठ्ठीने विजयी



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी तालुक्यातील ग्रामपंचायती मधील रिक्त असलेल्या ११ सदस्य निवडीसाठी निवडणूक घेण्यात आली असून त्यामध्ये सहा सदस्य बिनविरोध निवडून आल्याने पाच जागांसाठी मतदान घेण्यात आले त्यामध्ये एक नशिबाच्या चिठ्ठीने विजयी झाले आहेत. तालुक्यातील वळ २, दापोडा ३, पिंपळास १, कुकसे ३, बोरिवली १व शिरोळे १ या ग्रामपंचायती मध्ये एकूण ११ सदस्य पद रिक्त असल्याने निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. उमेदवारी अर्ज दाखल करताना वळ ग्रामपंचायती मधील रविता मुरलीधर पाटील, सचिन सत्यवान पाटील,दापोडा ग्रामपंचायती मधील सुगंधा वासुदेव पाटील, श्वेता पिंट्या पाटील,चांदणी देवानंद पाटील तर बोरिवली ग्रामपंचायती मधील बिनीश फरझीन सुसे हे सहा सदस्य बिनविरोध निवडून आल्याचे नायब तहसीलदार विशाल इंदुलकर यांनी जाहीर केले. पिंपळास ग्रामपंचायत मध्ये म्हस्के सुजाता कल्पेश कुकसे ग्रामपंचायती मध्ये दिलीप एकनाथ पाटील, जागृती सुभाष माघे, वैष्णवी चेतन पाटील हे सर्वाधिक मते मिळाल्याने तर शिरोळे येथे समसमान मते मिळाल्याने चिठ्ठी काढून शोभा जाधव या विजयी झाल्या आहेत. जानेवारी मध्ये झालेल्या अटीतटीच्या ग्रामपंचायत निवडणुकीत श्रमजीवी संघटना विरोधात विजय संपादन करून सत्ता हस्तगत केलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना गटातील तनुजा तन्वीर खाटीक या प्रभाग क्रमांक २ व ३ अशा दोन प्रभागातून विजयी झाल्याने एका प्रभागातून राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी घेतलेल्या पोटनिवडणुकीत श्रमजीवी संघटनेच्या शोभा गुरुनाथ जाधव व मनसेच्या मंजुळा लहू जाधव यांना समसमान १०८ मते मिळाल्याने नशिबाच्या चिठ्ठीमध्ये कौल श्रमजीवी संघटनेच्या शोभा गुरुनाथ जाधव या विजयी झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी नायब तहसिलदार विशाल इंदुलकर यांनी केली. या घोषणे नंतर श्रमजीवी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, तालुका अध्यक्ष सुनील लोणे, शहराध्यक्ष सागर देसक, जयदास मते, चंद्रकांत मते, गणपत मते यांनी विजयी झालेल्या शोभा गुरुनाथ जाधव यांचा सन्मान करीत त्यांचे अभिनंदन केले.

# लातूर क्रेडाईने सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून द्यावीत -आ.अमित देशमुख




**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर हे झपाट्याने वाढणारे शहर म्हणून नावारूपास येत आहे. गुणवत्ता शहर म्हणून लातूर शहराचा नावलौकिक आहे. स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी या शहराची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आदरणीय विलासराव देशमुख यांचे या शहरासंदर्भात बारकाईने लक्ष ठेवून आपलं घर पुढं नेण्याचे काम केले. लातुरातील गोलाईसारखी वास्तू ही स्थापत्य प्रकारातील एक वेगळे उदाहरण आहे. गोलाई निर्मितीला शंभर वर्ष पूर्ण झाले असून, शताब्दी वर्षाच्या निमित्ताने महापालिका प्रशासनाने केंद्र व राज्य सरकारकडे शंभर कोटींच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत मदत मिळावी यासाठी प्रस्ताव देण्यात यावा. जेणेकरून या रक्कमेची लातूर शहराच्या विकासासाठी मदत होईल. उद्याचे लातूर घडविण्याची भूमिका ही बिल्डर्सची आहे. ते क्रेडाईच्या माध्यमातून पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त करून यापुढील लातूरकरांसाठी कायद्याच्या चौकटीत राहून नियमानुसार कामे झाली पाहिजेत. शहरातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून द्यावीत, अशी अपेक्षा त्यांनी या वेळी व्यक्त केली.लातूर क्रेडाईच्या वतीने २०२३-२५ या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अमित देशमुख, लातूर महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, महाराष्ट्राचे क्रेडाई अध्यक्ष प्रमोद खैरनार, क्रेडाईचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील फुरडे, सहसचिव डॉ. धर्मवीर भारती, लातूर क्रेडाईचे मावळते अध्यक्ष सुबोध बेळंबे व सचिव महेश नावंदर, नूतन अध्यक्ष जगदीश कुलकर्णी व नूतन सचिव संतोष हत्ते यांची विशेष उपस्थिती होती. स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या जयंती दिनानिमित्त त्यांना आदरांजली व्यक्त करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. नूतन अध्यक्ष जगदीश कुलकर्णी व सचिव संतोष हत्ते यांच्याकडे मावळते अध्यक्ष सुबोध बेळंबे व सचिव महेश नावंदर यांनी मानदंड सुपुर्द केला. क्रेडाईचे मावळते सचिव महेश नावंदर यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागील प्रास्ताविक केले. तर मावळते अध्यक्ष सुबोध बेळंबे यांनी लातूर क्रेडाईचे २०२१ ते २०२३ या कालावधीत क्रेडाईने केलेल्या कामांची माहिती दिली. या वेळी बोलताना सुबोध बेळंबे म्हणाले, लातूर क्रेडाईने २०२१-२३ या काळात क्रेडाई आपल्या दारी हा अभिनव उपक्रम साजरा केला. या उपक्रमाद्वारे जवळपास ८७ बिल्डर्सची नोंद झाली व क्रेडाईचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. यामुळे लातूरकरांना व बिल्डर्सना याचा फायदा झाला. या वेळी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष व मावळते अध्यक्ष यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच क्रेडाईच्या वतीने २०२५-२७ या कालावधीसाठी अध्यक्ष म्हणून उदय पाटील यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच किरण मंत्री, उपाध्यक्ष अमोल मुळे, संतोष हत्ते, आशीष कामदार, विष्णु मदने, श्रीकांत हिरेमठ, दीपक कोटलवार, डॉ. धर्मवीर भारती, नागनाथ गित्ते, वुमन विंग्सच्या रिचा नावंदर, जयनंदा गित्ते, यांचाही आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. लातूर क्रेडाईसाठी स्वतःचे कार्यालय असावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. या वेळी लातूर येथील पापाशेठ ताथोडे यांनी क्रेडाईच्या कार्यालयासाठी स्वतःच्या मालकीची जागा देण्याचे जाहीर केले. त्यामुळे आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते पापाशेठ ताथोडे व ॲड. संजय पांडे यांचाही सत्कार करण्यात आला.नूतन अध्यक्ष जगदीश कुलकर्णी यांनी २०२३-२५ या कालावधीसाठी क्रेडाईच्या वतीने वेगवेगळ्या माध्यमातून कमिट्या स्थापन करून लातूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी क्रेडाई सर्वोतोपरी मदत करील, असे आश्र्वासन देऊन क्रेडाईच्या माध्यमातून लातूरला जनरल बॉडीची मिटिंग तसेच लातूर क्रेडाईला स्वतःच्या जागेत कार्यालय व लातुरात प्रॉपर्टी एक्स्पोचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सांगून या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबतची भूमिकाही विषद केली. या वेळी महाराष्ट्र क्रेडाईचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील फुरडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी लातूर क्रेडाईच्या माध्यमातून सर्वच प्रश्र्न सोडविण्यात आले असून, महापालिकेच्या हद्दवाढीचाही प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. यापुढे क्रेडाईच्या पदाधिकार्यांना संपूर्ण सहकार्य करू, असे आश्र्वासन त्यांनी दिले. ...पान ६ वर

# ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमाचा मंद्रूपमध्ये १८६१ जणांनी घेतला लाभ!




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

केंद्र आणि राज्य सरकारने अनेक कल्याणकारी योजना सुरू केले आहे. त्या सर्व योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. जनतेची शासकीय कामे विना विलंब व्हावेत जर नागरिकांच्या तक्रारी आल्यास त्याची दखल मला घ्यावी लागेल असा इशाराही दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी दिला. या उपक्रमात १८६१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. परिषदेच्या शाळेत मंद्रूप येथे शासन आपल्या दारी अभियानाचा शुभारंभ आमदार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, प्रभारी प्रांताधिकारी संतोष देशमुख, मंद्रुप तहसीलदार राजशेखर लिंबारे, माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य विद्युलता कोरे, बाजार समितीचे संचालक आप्पासाहेब पाटील वडकबाळकर, सरपंच अनिता कोरे, हनुमंत कुलकर्णी, मळसिद्ध मुगळे, गौरीशंकर मेंडगुदले, यतीन शहा आदी उपस्थित होते. देशमुख म्हणाले अतिवृष्टीचे पैसे लवकरच संबंधित शेतकऱ्यांना देण्यात येतील शेतकऱ्यांनी विविध कृषी योजनांचा लाभ घ्यावा. केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रुपये मदत म्हणून रक्कम येते. मात्र केवायसी नसल्यामुळे ती रक्कम संबंधित काही शेतकऱ्यांना वेळेत मिळत नसल्याची अडचण तहसील कार्यालयाने त्वरितदूर करून शेतकऱ्यांना पैसे मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत, रेशनचे जीर्ण झालेले व विविध विभाजित कार्ड त्वरित बदलून मिळावेत प्रत्येक लाभार्थ्याला धान्य मिळाले पाहिजे ज्यांना धान्य मिळत नाही अशा दुकानांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करा वीज वितरण मंडळांनी शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे जळालेले डीपी त्वरित बदलून घ्यावेत अथवा दुरुस्त करावेत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्याला नेमणूक दिलेल्या गावी रोज हजर असणे व मुख्यालयाला मुक्कामी राहणे गरजेचे आहे विविध योजनांच्या लाभासाठी नागरिकांना शासकीय कार्यालयमध्ये हेलपाटे मारावे लागतात. म्हणून जनतेला होणारा हा त्रास ओळखून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासन आपल्या दारी हा उपक्रम राबवीत आहेत. हा उपक्रम दर महिन्याला एकदा मंद्रूपला घेऊन जास्तीत जास्त फायदा जनतेला होण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत असेही आव्हान त्यांनी केले.



# लोहोपे तलावातील पाणी उपशाला ग्रामस्थांचा विरोध; आंदोलनाचा इशारा

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील लोहोपे येथील तलाव हा पाटबंधारे विभागामार्फत बनवलेला असुन, तलाव बनवित असताना लोहोपे गावच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत, त्यामुळे आदिवासी शेतकरी हा अल्पभुधारक बनलेला आहे, सदर लोहोपे तलावावर अवलंबून असणारे भातशेती व भाजीपाला लागवड करून आपली उपजीविका भागात आहेत. तर केळठण, गोराड, निंबवली ही गावे देखील याच तलावाच्या पाण्यावर अवलांबून आहेत. या गांवाची वाढती लोकसंख्या विचारात घेता भविष्यात पिण्याच्या व वापराच्या पाण्याची अडचण निर्माण होणार आहे. तरी या बंधाऱ्याचे पाणी इतर गावांना देऊ नये असाहि ग्रामस्थांनी केला आहे. उन्हाळ्यामध्ये तलावातील पाणी साठा खुप कमी होवून पाणी टंचाईला समोरे जावे लागते म्हणून लोहोपे गावातील रहिवासी असलेले आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेचे वाडा तालुका कमिटीचे उपाध्यक्ष आदेश पाटील यांनी उपविभागीय अभियंता पाटबंधारे उपविभाग (सिं)क्र २ कळवा -ठाणे यांचेकडे व तहसीलदार वाडा यांना देण्यात आले असून वेळप्रसंगी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# कर्मचारी आणि अधिकारी यांच्या सहकार्यामुळेच चांगले काम करता आले -उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे



**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील महसूल विभागाचे कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी तसेच तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या सहकार्यामुळेच आपणास असा उपविभागांमध्ये चांगले काम करता आले आपल्या कार्यकाळामध्ये महसूल विभागाची १००% वसुली झाली लातूर जिल्ह्यामध्ये औसा तालुका महसूल विभागाच्या वसुलीमध्ये प्रथम आला याचा मला सार्थ अभिमान वाटतो अशी प्रतिक्रिया उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांनी केले असा येथील प्रशासकीय इमारतीमध्ये बदली झाल्यामुळे आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते याप्रसंगी व्यासपीठावर तहसीलदार भरत सूर्यवंशी महसूल विभागाचे निवासी नायब तहसीलदार दत्ता कांबळे निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार प्रवीण आळंदकर पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे मंडळ अधिकारी निळकंठ जाधव यांची उपस्थिती होती याच कार्यक्रमांमध्ये नायब तहसीलदार प्रवीण आळंदीकर आणि उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांचा निरोप समारंभ आयोजित करून आवसा महसूल कर्मचाऱ्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी पुढे बोलताना अविनाश कांबळे म्हणाले की औसा तालुक्यामध्ये २०१९ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने व कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यासाठी चा उत्कृष्ट अनुभव मला मिळाला तर कोरोना काळामध्ये महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने टीम वर्क करता आले असेही त्यांनी यावेळी सांगितले अधिकारी म्हणून कसल्याही प्रकारचा गर्व न ठेवता आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या हातून काही चुका झाल्या तरी त्या समजावून घेऊन कामकाज होणे आवश्यक असते प्रत्येक वेळी कार्यवाहीची आवश्यकता नाही असेही सांगून त्यांनी औसा तालुक्यातील सर्व महसूल कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनापासून आभार व्यक्त केले यावेळी प्रवीण आळंदकर दत्ता कांबळे निळकंठ जाधव तलाठी अंबिका जोगदंड आणि महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत राजुरे यांनीही शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले कार्यक्रमासाठी औसा तालुक्यातील तलाठी मंडळ अधिकारी व तहसील कार्यालयातील सर्व महसूल कर्मचारी उपस्थित होते.